संस्थापकः राजन राजे

KRISHANARPANMASTU

# कृष्णार्पणमस्तु

संपादकः महेशसिंग ठाकूर

RNI: MAHMAR/2023/88105

Volume : 3 | Issue : 4 | Marathi Monthly | Thane, 1 October 2025 to 31 October 2025 | Pages 16 | Price : 10/-

# धार्मिक अंधश्रद्धेपेक्षा, ‘राजकीय-अंधश्रद्धा’ समाजाचं अधिक नुकसान करतात! - राजन राजे



‘‘राजकीय-अंधश्रद्धांना जोवर आपण मराठी-माणसं ‘मूठमाती’ देत नाही व स्वतःला सक्षम बनवत नाही, तोवर मराठी-माणसांचं पिढ्यानपिढ्या नुकसान होतच रहाणार आहे, मराठी-माणसं गुलामीत ढकलली जातच रहाणार आहेत... मराठी-माणसानं स्वतःला सक्षम बनवणं म्हणजे, व्यक्ति आधारित कमी आणि धोरण आधारित जास्त राजकारण केले पाहिजे.’’

*....राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*

**ठाणे (प्रतिनिधी) :** अंधश्रद्धा स्वतःच एक ‘व्यवस्था’ असते; जी आतून मुठभरांच्या वर्चस्वाला चांगलीच आधारभूत होत रहाते... आणि, आजच्या भांडवली-व्यवस्थेत अशा अनेक अंधश्रद्धांना, ‘व्यवस्था’ चालवणारे जाणिवपूर्वक, याच कारणामुळे पुढावा देत असतात. म्हणूनच तर, आपल्या महाराष्ट्रात, दिवसागणिक खोल गर्तेत जात चाललेल्या मराठी-माणसाला, विविध धर्मसंप्रदायात व्यवस्थेकरवी कौशल्याने अडकवलं जातं. परिणामी, धार्मिक अंधश्रद्धा, जेवढं समाजाचं नुकसान करतात; त्याच्यापेक्षा कैकपटीने अधिक ‘राजकीय-अंधश्रद्धा’ समाजाचं नुकसान करतात! असे रोखठोक भाष्य ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष आणि ज्येष्ठ कामगारनेते, तथा राजकीय व सामाजिक विचारवंत राजन राजे यांनी नुकतेच ठाण्यात केले. ‘महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती’च्या राज्य कार्याध्यक्षपदी संजय बनसोडे यांची नियुक्ती झाल्याबद्दल, समितीच्या ठाणे शहर शाखा आणि ठाण्यातील सर्व परिवर्तनवादी संघटनांच्या वतीने, मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या, नागरी सत्कार समारंभात ते बोलत होते. यावेळी, उपस्थितांना संबोधित करताना, राजन राजे पुढे म्हणाले की, कुणी बुलंद आवाजात भाषणं ठोकत, आपलं प्रतिनिधित्व करणारा अमकातमका राजकीय पुढारी, जो कधि ‘जाणता राजा’ म्हणून मिरवत असतो; तर, कधि कुठलं ‘सम्राटपद’ भूषवत असतो. आपल्या समाजाचं पुनरुत्थान करेल, आपल्यावर चारही बाजुंनी होत असलेला अन्याय दूर करेल, अशी थेट ‘अवतार-संकल्पने’ला जाऊन भिडणारी आपली अंधश्रद्धा असते; जेव्हा, तो नेता बोलत एक असतो आणि करत वेगळंच असतो... तो व्यवस्थेचा लाभार्थी तर असतोच; पण, व्यवस्थेच्या बळकट पाठिंब्यावरच त्याचं ‘नेतेपद’ अवलंबून असल्यामुळे, ही ‘राजकीय-नौटंकी’ तो तहहयात करत रहतो आणि लोकं त्या ‘राजकीय-अंधश्रद्धे’ला बळी पडत रहातात. उदाहरणच द्यायचं झालं तर, ‘कंत्राटी-कामगार पद्धती’चं निर्मूलन व ‘किमान-वेतन’ सन्मानजनक झाल्याखेरीज, उत्तरेचं नोकरपेशातलं आक्रमण थोपवल्याखेरीज आणि शहरं-उपनगरांतून प्रत्येक प्रौढ व्यक्तिमागे एक दुकान, एक मकान धोरण राबवून धनदांडग्या गुजराथी-भाषिक भांडवलदारवर्गाला रोखल्याखेरीज... ...पृष्ठ क्र. ७ वर

## झिरो सम गेम (Zero Sum Game)



समजा, दहा मित्र एक-एक हजार रुपये घेऊन, रमी किंवा तीनपत्ती खेळायला बसले आहेत... म्हणजे, सर्वांची मिळून दहा हजार रुपयांची किट्टी तयार झाली आहे. कोणी खिशातून अजून पैसे आणायला परवानगी नाही आहे, त्यांच्यात कोणीही बुकी नाहीये.

रात्रभर खेळल्यावर, दहापैकी काही जणांकडे, त्यांनी आणलेल्या एक हजार रुपयांपैकी जास्त पैसे जमा झालेले असतात; तर, काहीजणांकडे एक हजारपेक्षा कमी. त्यापैकी काहींनी पूर्ण हजार रुपये गमावलेले असू शकतात.

कोण जिंकले, किती जिंकले, कोण हरले, किती हरले? याचा तक्ता बनवला आणि बेरीज केली तर, बरोबर दहा हजार रुपये भरेल. एक रुपया कमी नाही की, जास्त नाही. ...पृष्ठ क्र. ३ वर

...जेव्हा अमेरिका, युरोपियन व नॉर्डिक देशांमध्ये आठवड्याला ३२ ते ४० तास कामाचे तास असतात...आणि, सध्या, अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या अंगिकारामुळे आठवड्याला कामाचे तास घटवून जास्तीतजास्त २४ ते २८ तास करण्याचा गांभीर्याने तिथे विचार सुरु असताना; भारतातले इन्फोसिसचे अतिशहाणे (वा)नरायण मूर्ती आठवड्याला ७० तास; तर, LT चा कुणी सुब्बूटूब्बू नावाचा उन्मत्त CEO, चक्क ९० तास काम करण्याचं फर्मान सोडायला लागले... तेव्हाच, कामगार-कर्मचारीवर्गाचे कामाचे तास वाढविण्याच्या नापाक हालचाली भाजप-शिंदे-पवार या ‘ट्रिपल-इंजिन’गटाकडून पड्याआड सुरु झाल्याचं सहजी ध्यानात आलंच होतं...आता फक्त प्रत्यक्षात त्यांनी दिवसाला १२ तास काम करण्याची ‘घोषणा’ करण्याचा, नेहमीच्या ‘भाजप-संघीय डावपेचा’नुसार एक खडा टाकून पाहिलेला आहे, एवढंच!....

*....राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*

...पृष्ठ क्र. ४ वर

अंतरंग



पृथ्वीवरील असाधारण तापमानवाढ लक्षात घेऊन, मेट्रो प्रकल्प रद्द करा, वृक्षतोड थांबवा!
- ॲड गिरीश राऊत
पृष्ठ क्र. ७



‘पुढचा’ डोनाल्ड ट्रंप नावाचा अमेरिकी-नेता होऊन ‘नेटा’... दाखवी आम्हासी मराठी-भविष्याच्या ‘वाटा’...!!!
....राजन राजे
पृष्ठ क्र. ९

# घोडबंदर सेवारस्त्याच्या विलीनीकरणाचा 'वादग्रस्त प्रकल्प' रद्द न झाल्यास, ठाणेकरांचा जनउद्रेक उसळणार!

## 'धर्मराज्य पक्षा'चा प्रशासनाला निर्वाणीचा इशारा...

**ठाणे (प्रतिनिधी) : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीतील, घोडबंदर रस्त्यावर असणाऱ्या, कापुरबावडी ते गायमुखपर्यंतच्या महामार्गावरील सेवारस्ता (सर्व्हिस रोड) मुख्य रस्त्यात विलीनीकरण करण्याचा निर्णय घेतलेला असून, या विलीनीकरणाच्या माध्यमातून सेवारस्ता (सर्व्हिस रोड) आणि मुख्य रस्त्यामधील पदपथ कायमस्वरुपी काढले जाणार आहेत. अशाप्रकारे पदपथ काढून टाकणे म्हणजे, सर्वसामान्य करदात्या पादचाऱ्यांच्या मुलभूत हक्कांवर गदा आणण्यासारखे होय. पदपथ हे, नागरिकांना चालण्यासाठी असतात, तेच काढून टाकल्यावर, नागरिकांचे जीवित धोक्यात येऊ शकते. याबाबत ठाणेकर नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असून, यासंदर्भात ठाणेकर नागरिकांचा उद्रेक झाल्यास, त्याला सर्वस्वी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी जबाबदार असतील असा इशारा 'धर्मराज्य पक्षा'ने दिला आहे.**

याच पार्श्वभूमीवर, 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने, दि. १६/०७/२०२४ रोजी, महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरव राव, ठाणे जिल्ह्याचे तत्कालीन पालकमंत्री शंभूराज देसाई, ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्य सचिव, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त, आणि ठाणे वाहतूक शाखेचे तत्कालीन उप-आयुक्त विनयकुमार राठोड यांना, पत्रव्यवहार करुन (पत्राचा संदर्भ क्र. धराप/मुंम/मरा/मंमुं/२०२४/५०) नागरिकांच्या वित्तहानी आणि जीवितहानीस कारणीभूत ठरणारा, घोडबंदर सेवारस्त्याच्या (सर्व्हिस




रोड) विलीनीकरणाचा वादग्रस्त प्रकल्प रद्द करणेबाबत... अशा आशयाची आग्रही मागणी करण्यात आली होती. याच अनुषंगाने पोलीस आयुक्तालय ठाणे शहर अंतर्गत, कासारवडवली वाहतूक उप-विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र राठोड यांची स्वाक्षरी असलेले, दि. १९/१२/२०२४ रोजीचे पत्र (जावक क्र.पोनि/वा.उपविभाग. कासारवडवली/८८१/२०२४) 'धर्मराज्य पक्षा'स तब्बल सहा महिन्यांनी प्राप्त झाले असून, सदर पत्रात, जितेंद्र राठोड साहेब, कासारवडवली वाहतूक उप-विभागाच्या हद्दीतील सेवारस्त्यावर (सर्व्हिस रोड) पार्क केलेल्या वाहनांवर, वाहतूक विभागाकडून, प्रचलित कायद्यानुसार केलेल्या कारवाईची आकडेवारी नमूद केलेली आहे; मात्र, मुख्य रस्ता आणि सेवारस्ता (सर्व्हिस रोड) यांच्या विलीनीकरणामुळे, पदपथ काढले जाणार असल्याने, अपघातांचा संभाव्य धोका निर्माण होणार आहे, त्याबद्दल वाहतूक विभागाने हात वर केलेले आहेत. महामार्गालगत असलेल्या सेवारस्त्यावर (सर्व्हिस रोड) अनधिकृतपणे वाहने उभी केली जातात, त्यावर वाहतूक विभागाकडून कारवाई होणे हे, क्रमप्राप्त आहे... परंतु, त्याचबरोबर नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून पदपथ हे अत्यंत महत्त्वपूर्ण असताना, तेच काढले जाणार असतील आणि त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या जीवितास धोका उद्भवत असल्यास, ठाणे वाहतूक शाखा आपली जबाबदारी टाळत असल्याचेच, कासारवडवली वाहतूक उप-विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र राठोड यांच्या उत्तरादाखल प्राप्त झालेल्या पत्रातून अधोरेखित होत आहे. मुळात, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम-१९६६ नुसार, इमारत रेषा आणि नियंत्रण रेषा यांमधील अंतरे कलम-१५४ नुसार, सेवारस्ता (सर्व्हिस रोड) व महामार्ग एकत्र करणे हे, कायद्याचे उल्लंघन असतानादेखील, खुद्द राज्य शासनाकडून सुरक्षिततेसंबंधीचे नियम पायदळी तुडविले जात असल्याचा 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष व 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे महासचिव महेशसिंग ठाकूर यांनी आपल्या पत्रातून प्रशासनाचा जाहीर निषेध व्यक्त केला आहे. मध्यंतरीच्या काळात, हा वादग्रस्त प्रकल्प रद्द करण्यात यावा, अशी मागणी घोडबंदरवासियांकडून करण्यात आली होती. असे असतानाही, नागरिकांच्या सुविधेसाठी आणि सुरक्षिततेसाठी असणारे पदपथ विलीनीकरणाच्या नावाखाली तोडले जाणे हे, अत्यंत धोकादायक असून, घोडबंदर सेवारस्त्याच्या (सर्व्हिस रोड) विलीनीकरणाचा 'वादग्रस्त प्रकल्प' ठाणेकर नागरिकांच्या असंतोषाचा भडका उडून, जनभावनेचा तीव्र उद्रेक होण्यापूर्वीच तत्काळ रद्द करण्यात यावा, अशी आग्रही मागणी, महेशसिंग ठाकूर यांनी, आपल्या पत्रातून करीत, यासंदर्भात ठाणेकर नागरिकांचा उद्रेक झाल्यास, त्यास सर्वस्वी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी जबाबदार असतील असा निर्वाणीचा इशारादेखील पत्राच्या शेवटी दिला आहे.

# वसईच्या 'स्टेलमेक लिमिटेड' कंपनीत, ६,६०० रुपयांची पगारवाढ!

**पालघर (प्रतिनिधी) :** 'धर्मराज्य पक्ष'प्रणित 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'ची युनियन असलेल्या, वसई तालुक्यातील 'स्टेलमेक लिमिटेड' या कंपनीतील कामगारांना, त्रैवार्षिक करारांतर्गत तब्बल ६ हजार ६०० रुपयांची भरघोस पगारवाढ झाली आहे. युनियनचे अध्यक्ष मा. राजन राजे यांच्या मार्गदर्शनाखाली, दि. ४ सप्टेंबर-२०२५ रोजी संपन्न झालेल्या या कराराचा कालावधी, मे-२०२४ ते एप्रिल-२०२७ असून, करारात नमूद केल्यानुसार, कामगारांना बोनस कायद्याप्रमाणे, सानुग्रह अनुदान (दिवाळी बोनस) तसेच, अटेंडन्स बोनसदेखील मिळणार आहे. त्याचबरोबर याआधी २० दिवसांपेक्षा कमी म्हणजे, १९ दिवस भरले तर, पूर्वी एक दिवसाचा पगार कापला जात असे, तो नियम आता रद्द करण्यात आला आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, गेली अनेक वर्षे काम करीत असणाऱ्या १० कंत्राटी कामगारांना 'कायम' करण्यात आल्याने, नव-अस्पृश्यता नावाची गुलामगिरी मोडीत काढण्याचे काम मा. राजन राजे यांच्या नेतृत्त्वाखाली पार पाडण्यात आले आहे. दरम्यान, वसई-विरारच्या या 'भाई'गिरीच्या पट्ट्यात, स्थानिक पुढारी म्हणून ओळखले जाणारे 'पेंढारी' कष्टकऱ्यांचे आर्थिक शोषण करीत होते. 'स्टेलमेक' कंपनीत 'धर्मराज्य'ची युनियन येण्याअगोदर तर, कामगारांना पगारवाढ ही माहीतच नव्हती.

त्यामुळे राजन राजे यांचं नेतृत्व स्विकारल्यानंतर, विपरीत परिस्थितीत दीर्घकाळ किल्ला लढवत राहिल्याने, पाच अंकी पगारवाढ जरी नसली तरी, सामंजस्य राखून तडजोडीअंती हा करार करण्यात आला. 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'ची परंपरा ही, नेहमीच लाखांचे पगार आणि लाखांचे बोनस अशी राहिलेली आहे... त्यामुळे इतर कंपन्यांतील कामगारांच्या तुलनेत, 'स्टेलमेक'च्या कामगारांना मिळालेली पगारवाढ अत्यल्प असली तरी, भविष्यातील पाच अंकी पगारवाढीची ही सकारात्मक सुरुवात होय, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कधीकाळी अत्यंत अल्प-उत्पन्नावर संघर्ष करणाऱ्या 'स्टेलमेक'च्या कामगारांना या करारांतर्गत, यापुढे २५ हजार रुपयांचे बिनव्याजी कर्ज उपलब्ध असून, सुमारे ४० टक्के थेट पगारवाढ झाल्याने, कामगार सभासदांमध्ये आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. याकराराप्रसंगी, 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे उपाध्यक्ष श्री. रमाकांत नेवरेकर, महासचिव श्री. महेशसिंग ठाकूर आणि सचिव श्री. समीर चव्हाण या पदाधिकाऱ्यांसमवेत, 'स्टेलमेक लिमिटेड' व्यवस्थापनाचे श्री. राजेश धिमन, श्री. विवेक शुक्ला, श्री. मनोज जाधव, श्री. प्रशांत राय, तर युनियन कमिटीच्या वतीने श्री. दिनेश चव्हाण, श्री. प्रवीण चव्हाण, श्री. महेंद्र जाधव, श्री. सुधाकर म्हसकर, श्री. परेश खिरखिरे या सभासदांनी उपस्थित राहून, करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

# दमनकारी शासनविरहीत वर्गविहीन समाजरचनेचा आग्रह!

**खलनायक म्हणून प्राण पडद्यावर एवढा जिवंत अभिनय करायचा की, एकदा त्याच्या चित्रपटातील प्रवेश-प्रसंगी प्रेक्षकांमधून पडद्यावर चप्पल भिरकावली गेली होती...त्या 'एपिसोड'वर खूष होत प्राणनं प्रतिक्रिया दिल्याचं स्मरतं, यापेक्षा, माझ्या अभिनयाची उत्तम पोचपावती, दुसरी कुठली असू शकेल?**

...पण, मुग्धा गोडबोले खालील संदेशात म्हणतात, तसा तो काळच वेगळा होता, पुरेसा भाबडा होता. जसजसं बॉलिवूड विकसित होत होतं; तसतशी भारतातली भांडवली-व्यवस्था देखील समाजाच्या सर्व स्तरांतून ऑक्टोपससारखी आपल्या विषारी स्पर्शिका (Tentacles) पसरवत होती आणि तेवढं तेवढं अवघ्या जगण्याचंच 'बाजारीकरण' व 'बधिरीकरण' होत होतं...समाजाचं 'भाबडेपण' कठोर, हृदयशून्य वस्तुस्थितीच्या ऐरणीवर सतत घासलं जात बोथट होत होतं.

**असाच पुढे जात भांडवली-व्यवस्थेला चांगलाच 'सरावलेला' (स्थिरावलेला मात्र नव्हे; कारण, त्यातल्या शोषण, अस्थैर्य व अनिश्चिततेनं, तो मनातून कायमच धास्तावलेला व अस्वस्थ असतो) व त्याहीपेक्षा, उंबरातले किडे मकोडे, उंबरी करती लिला या 'गदिमां'च्या उक्तिनुसार, भांडवली-व्यवस्थेच्या चिखलात डुंबत त्यातच रममाण झालेला व त्या चिखलाचंच 'व्यसन' जडलेला; आजचा समाज मात्र, तसा तिळमात्र 'भाबडा' राहिलेला नाही.**

...कार्ल मार्क्स भांडवलाच्या रंध्रारंध्रांतून रक्त, घाण, पू वहात असतो म्हणतो; तद्वतच, या आधुनिक समाजाच्याच मनामनातून रक्ताचं साचलेपण, साचलेली घाण, दुर्गंधीयुक्त पू नायगारा धबधब्यासारखा धो धो वहात, सतत बाहेर कोसळू पहात असतो...जसा तो अमित मालवीयकृत भाजपाई आयटी-सेलच्या प्रत्येक 'बिट'मधून बाहेर पडत असतो. कधि महात्मा गांधींविषयी; तर कधि पं. नेहरुंपासून सुरुवात करत छातीवर अतिरेक्यांच्या गोळ्या झेललेल्या इंदिरा गांधी, अतिरेक्यांनी घडवलेल्या स्फोटात शरीराच्या चिंधड्या उडालेल्या राजीव गांधी (आठवा, राजीव गांधींनी आणलेल्या 'कॉम्प्युटर-युगा'ला या लोकांनी केलेला कडवा विरोध)... ते देशासाठी भयंकर वैधव्य निमूटपणे भोगणाऱ्या सोनिया गांधींपर्यंत!

...आणि आताशी ही 'व्होटचोरां'नी पाळलेली गँग, 'व्होट चोर, गद्दी छोड' अशी बुलंद घोषणा देत भारतभर फिरणाऱ्या निधड्या छातीच्या राहुल गांधींच्या मागे हात धुवून लागलेली आपण पाहतो आहोत आणि आपल्या ५६ इंची छातीची सगळी अंडीपिल्ली जगासमोर उघडी पडली; तरी, रेचक दिलेल्या आतड्यातून अनियंत्रितपणे खळबळून मळ बाहेर पडत रहावा, तशी ती मळमळ अथकपणे व बेशरमपणे भारताच्या रस्तोरस्ती बाहेर सांडत रहाते.

प्रियाला कर्करोगाशी झुंजताना, ज्या संवेदनशून्य घृणित टिकेचा सामना करावा लागला; त्याचं मूळ, भांडवली-समाज रचनेतच दडलेलं आहे...अनेक अंतर्विरोध खच्चून भरलेल्या, हृदयशून्य स्वार्थाने बजबजलेल्या व नृशंस कुरघोड्या करण्याला 'व्यावसायिकता' संबोधणाऱ्या भांडवली-समाजातून... वेळोवेळी कुठल्या न् कुठल्या निमित्ताने व वेड्यावाकड्या स्वरुपात, संवेदनांच्या उमलत्या कळ्या जाळूनपोळून काढणारे अंगार प्रस्फुटित होत रहाणारच.

**...त्यासाठीच, भारतीय अध्यात्मात वर्णिल्याप्रमाणे सर्वे सुखिनः सन्तु, सर्वे सन्तु निरामयः अशा अवस्थेप्रत जाण्यासाठी कार्ल मार्क्सप्रणित, दमनकारी शासनविरहीत वर्गविहीन समाजरचनेचा (Stateless Classless Society) आग्रह, व्यावहारिक शक्यतेच्या पातळीपर्यंत आपण धरायला हवा!**

***...राजन राजे*** *(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*

**मुग्धा गोडबोले....**

**जुलै २०२३ मध्ये प्रियाने इंस्टाग्रामवर एक व्हिडिओ शेअर केला होता....प्रकृतीच्या कारणामुळे सध्या सुरु असलेल्या मालिकेतून मी बाहेर पडते आहे.**

**चॅनेलनेही आपल्या Official Page वरुन तो व्हिडिओ शेअर केला. प्रियाला कॅन्सर झाला होता...तरीही, ती काही काळ शूटिंग करत होती; पण, ती त्या ट्रीटमेंटमुळे थकत होती. त्या मालिकेत ती नकारात्मक भूमिका करत होती. त्याचा परिणाम म्हणून असेल, पण त्या व्हिडिओ खाली अनेकांनी अत्यंत वाईट कमेंट्स लिहिल्या होत्या...अगदी, इथे उच्चारता येणार नाहीत अश्या! काय वाटलं असेल तिला?**

**प्रिया गेली...दोन वर्ष झगडून थकली. त्याबद्दल अतोनात दुःख आहे. फार कमी गोष्टींनी मी इतकी अस्वस्थ होते. एरवी तशी मी 'टगी' आहे. पण, प्रिया फार गोड मुलगी होती. फारच सज्जन! राहून राहून पुन्हा तोच प्रश्न...का लिहितात लोक एखाद्याबद्दल इतकं वाईट? कलाकाराच्या कामाची पावती वगैरे म्हणायला मुळात आता प्रेक्षक इतके भाबडे राहिले आहेत का? कलाकार, त्याचं काम, प्रतिमा यातला फरक न कळण्याइतके?**

**स्वतःमधलं काहीतरी घाणेरडं बाहेर काढायचा मार्ग झालाय तो आता. एकानं सुरु केलं की, सगळे सुरु होतात...विष पसरत जातं.**

**असो.**

**प्रिया, =ज=ज=जफार फार दुर्दैवी घटना!**

---

## झिरो सम गेम (Zero Sum Game) ...पृष्ठ क्र. १ वरुन

जुगाराच्या अड्ड्यावर हेच होते. फक्त जुगाराच्या अड्ड्याचा बुकी प्रत्येक राऊंडला त्याचे कमिशन काढून घेत असतो. सरकारी किंवा खाजगी लॉटरीमध्ये हेच होत असते. लॉटरी चालवणारे स्पॉन्सर, आपले कमिशन काढून घेत असतात. आता सरकारने बंदी आणलेल्या ऑनलाइन गेमिंगमध्येदेखील हेच होत होते.

या सर्व प्रकारात सहभागी झालेल्यांकडून जमा झालेली किट्टी तेवढीच राहते. ती फक्त हरलेल्यांकडून जिंकलेल्यांकडे हस्तांतरित होते. याला झिरो सम गेम म्हणतात. पत्ते, जुगार, मटका, ऑनलाईन गेमिंग, लॉटरी किंवा ऑप्शन ट्रेडिंग हे सर्व झीरो सम गेमचे प्रकार आहेत.

_या सर्वात धुमाकूळ घातला गेला आहे भारतातील ऑप्शन ट्रेडिंग बाजारात. 'सेबी'ने कारवाई करण्यापूर्वी, भारतातील ऑप्शन ट्रेडिंगमध्ये दररोज काही दशलक्ष कोटी रुपयांचे नोशनल व्यवहार होत होते. गेली दहा वर्षे या बाजाराचा आकार, दर साल दर शेकडा ५० टक्क्यांनी वाढत होता. भारतासारख्या गरीब विकसनशील देशातील ऑप्शन ट्रेडिंग बाजाराचा वाटा, एकूण जागतिक ऑप्शन ट्रेडिंग बाजारात किती असेल असे वाटते? जागतिक बाजाराच्या ८० टक्के... सेबीच्या हस्तक्षेपानंतर तो आता थोडा-बहुत कमी झाला आहे.

यामध्ये तरुणांचा सहभाग अजूनही खूप मोठा आहे. यातील कोणालाही ऑप्शन, फ्यूचर, फॉरवर्ड कव्हर, डेरिव्हेटिव्ह मार्केट यामधील मॅथेमॅटिकल फॉर्म्युले असतात हेदेखील माहित नाही.

कोणत्याही 'झिरो सम गेम'मध्ये भाग घेणारे, अर्थात पैसे कमावण्यासाठी त्यात सहभागी होतात हे उघड आहे. आता मजा बघा... जे जे जिंकतात, ते निमुटपणे जिंकलेले पैसे घेऊन घरी जात नाहीत. आधी आणलेले मुद्दल आणि जिंकलेले पैसे फिरुन एकदा घालून अजून पैसे जिंकू असे म्हणून, ते बैठकीतून उठत नाहीत. जे हरतात ते झालेला तोटा भरुन काढू म्हणून अजून पैसे घेऊन येतात. दागिने, जमिनी विकतात. कर्जे काढतात... कर्जामध्ये अखंड बुडतात आणि आत्महत्यादेखील करतात.

तुम्ही जितका जास्त वेळ कोणत्याही झिरो सम गेममध्ये स्वतःचे पैसे लावाल, उठून जाणार नाही, तितकी तुम्ही पैसे गमावून बसण्याची प्रोबबिलिटी वाढत जाते. पैसे कमवतात फक्त बुकी, स्पॉन्सर्स, ब्रोकर्स इत्यादी.

गणपतीमध्ये दिवाळीत आणि कुटुंबांमध्ये पैसे लावून पत्ते वगैरे खेळले जातात. मीदेखील शाळा कॉलेजच्या मित्रांबरोबरच्या पिकनिकला खेळतो. त्यात धम्माल आहे. पण, तो प्रकार पूर्णपणे वेगळा. ज्यावेळी झिरो सम गेमची इंडस्ट्री कॉर्पोरेट/वित्त भांडवल चालवते, तो भिन्न प्रकार आहे. त्याचे प्रवर्तक असतात. त्यांनी भांडवल घातलेले असते. त्या भांडवलावर त्यांना नफा कमवायचा असतो. असे असले तरी, त्यांचे भांडवल फक्त त्यांनी घातलेला पैसा नसतो; तर, या गेममध्ये सहभागी होणाऱ्यांची मानसिकता, हे त्यांचे प्रमुख भांडवल असते. जास्तीतजास्त लोकांनी, जास्तीतजास्त पैसे घेऊन गेम खेळावा म्हणून, कोणीही खेळण्याचे बंद करु नये म्हणून, ते सर्व क्लुप्त्या करतात. त्यांच्या मार्केटिंगसाठी भरपूर भांडवल ओततात.मी येथे झिरो सम गेमचे नैतिक मूल्यमापन करत नाहीये. मी बेकायदेशीरपणे जुगाराचे अड्डे चालवणाऱ्यांबद्दल बोलत नाही.

मी विविध 'झिरो सम गेम' चालवणारी कॉर्पोरेट्स आणि त्यांच्यावर निगराणी राखणारी सेबीसारखे नियामक मंडळे यांच्याबद्दल बोलतो आहे, राज्य आणि केंद्र शासनाबद्दल बोलतो आहे.

ते कोठे असतात? ज्यावेळी पुरेशा उत्पन्नांची साधने नसणारे, भौतिक आकांक्षा चेतवले गेलेले, वैफल्यग्रस्त लाखो तरुण झिरो सम गेम खेळण्यात आयुष्य बरबाद करत असतील; तर, हा समाजाचा व राष्ट्राचा प्रश्न बनतो, नसेल बनत तर, बनला पाहिजे !!!

***...संजीव चांदोरकर***

***भले, यापूर्वीच मी कामगारांसाठी प्रचंड लिखाण, शेकडो भाषणे व असंख्य संघर्ष-आंदोलने केली असली; तरीही खास वरील संदर्भात कामगार-प्रबोधन, कामगार-जागृती (कामगारघातकी धोरणांविरुद्ध प्रभावी उपाययोजनांसह) म्हणून, एक चारसहा लेखांची मालिकाच, क्रमशः व्हॉट्सपवरुन आजपासून शक्यतोवर दर दिवशी पाठवायचं म्हणतोय...कामगारांनी प्रतिसाद दिल्यास ती मालिका चालू राहील व वाचून ती लेखमालिका कामगारांना उपयुक्त वाटलीच; तर, तिची छोटेखानी पुस्तिका आपण प्रकाशित करण्याचा विचार करु शकतो, एवढं कृपया ध्यानात घ्या!***

लेखक : ***राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष व धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ)

## लेख क्रमांक १

आज जेवढे आवाज तुम्ही कामगारांना फासावर चढवून कायमचे दाबून टाकताहात; त्याहीपेक्षा, आमचं 'मौन' अधिक सामर्थ्यशाली ठरण्याची वेळ लवकरच येईल असं एखाद्या प्रेषितासारखं उच्चारत 'ऑगस्ट स्पाईज' नावाचा कामगार हसत हसत ११नोव्हेंबर-१८८७ रोजी फासावर गेला...वर्ष १८८५-८६ मध्ये शिकागोमधील शेकडो कामगारांचे बळी घेणाऱ्या कामगार-संघर्षाच्या पार्श्वभूमीवरील ते ऐतिहासिक क्रांतिकारी बोल, पुढे खरे ठरले आणि २० शतक उजडता उजाडता ८८८ (८ तास काम, ८ तास विश्रांती व ८ तास कौटुंबिक-कार्य व करमणूक) असा प्रघात प्रदीर्घ काळच्या संघर्षांतून तयार झाला...ज्याच्यावर, बोळा फिरवण्याचे अत्यंत संतापजनक व अमानुष काम सध्या महाराष्ट्रात सुरु झालंय.


दिवसाला १२ तास काम करण्याची महाराष्ट्र-सरकारची घोषणा म्हणजे, 'उषःकाल होता होता काळरात्र झाली' अशा धर्तीची किंवा 'घड्याळाचे काटे दिडशे-दोनशे वर्षे जबरदस्तीने मागे फिरवण्यासारखं' आहे!

इंग्लंडमधील कारखान्यांमधून १६-१६ तास राबत फॉस्फरसच्या वाफा फुफ्फुसात गेल्यामुळे ठिसूळ झालेली हाडे व पाठीचा कणा वाकलेल्या लहान मुलांच्या आणि कापड-गिरण्यांच्या कोंदट, तंतूमय प्रदूषित हवेने खोकून खोकून खंगलेल्या कामगारांची कुटुंबच्या कुटुंबे निव्वळ जगण्यासाठी आपल्या आत्मसन्मानाशी तडजोड करत गुलामीत कशी जगायची आणि मानवी रक्ताघामाचं सोन्यात आणि जिवंत हाडामांसाच्या कामगारांचं निर्जीव भांडवलात रुपांतरण करण्याचं एक जीवघेणं जैव-रासायनिक (lchemy) भांडवली-सूत्र कसं काम करत होतं, त्या विदारक सत्याची कार्ल मार्क्सने केलेली मांडणी (कम्युनिस्ट-मॅनिफेस्टो... वर्ष-१८४८ व 'दास कॅपिटल') आज आपल्या सगळ्यांनाच हटकून आठवल्याखेरीज रहाणार नाहीच!

सगळी प्रतिगामी-वाटचाल त्याच दिशेने सुरु झालीय... हे दिवसाला १२ तास काम करण्याचं काय घेऊन बसला आहात...या आणि याहीपेक्षा पुढे अनेक गोष्टी घडत जातील, जर असेच आपण राजकीयदृष्ट्या निद्रिस्त व निपचित पडून राहिलो तर! आपण स्वतःच्या हाताने स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारुन घेणारे, आपल्या देशातले दुर्दैवी कामगार आहोत (विशेषतः, महाराष्ट्रातले), हे लक्षात घ्या...बापजाद्यांनी कष्टाने, त्यागाने कमवून ठेवलेली व आयती हाती आलेला जमीनजुमला-धनसंपदा पुढच्या नादान पिढीला त्यात भर घालणं सोडाचं; पण, आहे ते टिकवून ठेवता येऊ नये...अशी दारुण अवस्था आहे, आपल्या कामगार-चळवळीची.

कामगारच, मोठ्याप्रमाणावर कामगाराचा शत्रू बनणं थांबल्याशिवाय, सतत एकजुटीने 'संघर्षरत' राहिल्याशिवाय व कामगार, कामगार म्हणूनच 'मतदान' करायला लागल्याशिवाय...ही आपल्याला देशोधडीला लावू पहाणारी व गुलामी-अवस्थेत ढकलू पहाणारी परिस्थिती बदलणार नाही, नाही म्हणजे नाहीच!

...मात्र प्रथम, या सगळ्याचंच मूळ देशातल्या कंत्राटी-कामगार पद्धतीत आहे, हे आपण समजून घेतलं पाहिजे. बैल गेला आणि झोपा केला, तसे आता कुठे कामगार-चळवळीतले अनेक 'मोरु' झोपेतून या बारा तासांच्या घोषणेमुळे जागे व्हायला लागलेत आणि आपल्याच लेखांची व भाषणांची कॉपी मारत (ती ही त्यांना धड जमत नाहीये) आळोखेपिळोखे देत आवाज उठवायला लागलेत... जेव्हा, ठिणगीचा वणवा पेटून बराच काळ लोटलाय...!!!



जसा युरोपियन लोकांचा वसाहतवाद जगभर पसरला...ते जसे परक्या देशातल्या (ज्या देशावर त्यांना सत्ता मिळवायची होती) 'मीर जाफर'सारख्या देशद्रोही व गद्दार लोकांच्या समूहाला ओळखून त्याला जवळ करायचे. त्यांना शस्त्रसाठा, पैसा पुरवत त्यांना हाताशी धरत...त्या त्या देशात चंचूप्रवेश करायचे व पुढे हातपाय पसरायचे; तोच प्रकार व तोच प्रयोग, सगळ्याच कंपन्या-कारखान्यांतून अशा अत्यंत नीच-हलकट व स्वार्थाने पार आंधळे झालेल्या कामगारांमधल्या 'मीर जाफरी' अल्पसंख्याक गटाला हाताशी धरुन केला जातोय. एकदा कामगारच कामगाराचा शत्रू बनला की, व्यवस्थापनाचं पुढचं काम अगदीच सोपं होतं. जोडीला शासन व संपूर्ण भांडवली-व्यवस्था असतेच.

...फक्त, महाराष्ट्रातली 'कंत्राटी-कामगार पद्धत' नष्ट करा (तोच मूळ रोग अहे), मग बघाच! अन्यायी-अत्याचारी-शोषक भांडवली-व्यवस्थेच्या पत्त्याच्या बंगल्याचा एवढा एकच 'कंत्राटी-कामगार पद्धती'चा पत्ता काढून घेतलात की, क्षणार्धात हा अवघा अन्यायी-अत्याचारी बंगला कोसळून पडेल!

आपण आपल्या या लेखमालिकेत अजून पुढे सरकण्यापूर्वी कामगार मंत्री श्री. आकाश फुंडकर यांनी रोजच्या बारा तासाच्या कामाबद्दल, जे जाहिरपणे कामगारांची दिशाभूल करणारं वाक्ताडन केलंय, त्याचा यथास्थित समाचार प्रथम घेऊया.

...त्यांच्या म्हणण्यानुसार, कामगार-मंत्रालयाने आठवड्याचे एकूण कामाचे तास पूर्वीसारखेच जास्तीतजास्त अठ्ठेचाळीसच ठेवलेले असून; फक्त, आठवड्याच्या कुठल्याही एका दिवशी पूर्वीच्या जास्तीतजास्त आठ तासांऐवजी बारा तास काम करवून घेण्याची उद्योग जगताला परवानगी दिलेली आहे. इथेच 'ग्यानबाची मेख' दडलेली आहे...भाजपाचे हे 'कामगारमंत्री', नावापुरतेच 'कामगारमंत्री' असून प्रत्यक्षात 'मालकमंत्री' आहेत; म्हणजेच, उद्योग-जगताचे सरळ सरळ 'दलाल' आहेत! ते पुढे जाऊन मखलाशी (खरी म्हणजे, 'बदमाषी') करतायत की, नाहीतरी हल्ली सगळीकडे काम गारांकडून सर्रास दिवसाचे बारा तास काम करवून घेतले जाते आहे; मग, त्यापेक्षा अधिकृतरित्या दिवसाचे कामाचे तास वाढवून निदान कामगारांना अधिकच्या चार तासांचा 'ओव्हरटाईम' मिळवून देण्याची आम्ही 'व्यवस्था' करतो आहोत ते कामगारांसाठी चांगलंच की...अरे व्वा, या 'मालकमंत्र्यां'ना कामगारांची केवढी हो काळजी? जर, या कॅबिनेट दर्जाच्या मंत्र्यांच्याच कबुलीजबाबानुसार महाराष्ट्रात बहुतेक ठिकाणी जबरदस्तीने दिवसाचे बारा बारा तास करवून घेतले जात असेल; तर, 'कामगारखातं' नावाचा 'पांढरा हत्ती', काय बकासुरासारखं फक्त वरकमाईचं 'खाण्या'साठी पोसला गेलेला आहे की काय? ...की, बांद्रा-कुर्लामधलं अवघं कामगारखातं आरामशीर वातानुकूलित कार्यालयात टेबलावर ढेंगा टाकून झोपा काढत असतं??

वस्तुतः महाराष्ट्राच्या कामगारविश्वाची परिस्थिती एवढी भयावह व अस्वस्थ करणारी आहे की, देशीविदेशी (विशेषतः, पाशवी आर्थिक ताकद असलेल्या व म्हणूनच वरपासून खालपर्यंत सगळंच 'कामगारखातं' खिशात टाकू शकणाऱ्या 'बहुराष्ट्रीय-कंपन्या') एकूणएक सगळ्याच कंपन्या-कारखान्यांतून 'कायम' कामगारांची भरती-प्रक्रिया पूर्णतया थंडावलेली आहे व सगळीकडे 'कंत्राटी-गुलामां'चे जत्थेच्या जत्थे (त्यात, भारतीय राज्यघटनेतील 'महाराष्ट्रघातकी' तरतुदीचा आधार घेत, महाराष्ट्रात घुसलेल्या उत्तर भारतीय गुलामांची संख्या मोठीच) मुळातूनच जाणिवपूर्वक 'नपुंसक' व दुबळे-लुळेपांगळे ठेवले गेलेले कामगार-कायदे, बेधडक धाब्यावर बसवून महाराष्ट्राच्या उद्योग-सेवा क्षेत्रात जागोजागी काम करताना आपल्याला दिसतात...पण, 'वरकमाई'च्या राक्षसी हव्यासापोटी डोळ्यावर कातडं ओढून 'गांधारी' बनलेल्या (धृतराष्ट्राचं आंधळेपण निदान जन्मजात तरी होतं, त्यात त्याचा स्वतःचा काहीच दोष नव्हता) या तथाकथित 'कामगार-खात्या'तल्या (प्रत्यक्षात, 'मालक-खातं') अधिकाऱ्यांना दिसत नाहीत! कामगार-मंत्रालयाच्या आशिर्वादाने कंपनी-कॉर्पोरेटीय क्षेत्राने 'कंपनी-दहशतवाद' (Corporate-Terrorism) माजवून 'अनुचित कामगार प्रथां'चा हैदोस घालत...भांडवलदारवर्गाने कामगारांच्या युनियन्स संपवत आणल्यात किंवा त्या आपल्या 'बटीक' तरी बनवल्यात. अनेक कंपन्यांमधून 'युनियन-पुढारी' कोण, कुठल्या पुढाऱ्याशी वा कुठल्या युनियनशी बोलणी करणार...हे आता तिथले बदमाष व प्रत्यक्षात कायद्यानुसार 'गुन्हेगार' असलेले HR/IR अधिकारीच बेलाशक ठरवायला लागलेत, ज्यांना, प्रगत पाश्चात्य देशात, असा 'अनुचित कामगार प्रथां'चा (Unfair Labour Practice) अवलंब केल्याबद्दल किमान दोन ते कमाल पाच वर्षांपर्यंत तुरुंगवास भोगायला लागेल; पण त्याबाबतीत आपल्याकडे नन्नाचा पाढाच! ...मग, सांगा आता कामगारहिताच्या दृष्टीकोनातून, कामगार-कायद्यात व कामगारखात्यात काय दम उरला? तरी यांच्या पार्श्वभागाला,...पृष्ठ क्र. ११ वर

# दीड-दमडी

## पंचाहत्तरीच्या (काही) नोंदी

मला आठवतं, मी तेव्हा या भूमीवरच नव्हतो. आकाशाच्या पोकळीत कुठंतरी होतो. तेव्हा मला सांगण्यात आलं की भारत नामक देशात तू जा आणि त्या देशाचा उद्धार कर. मी म्हणालो की मला तुम्ही कुणाच्या तरी पोटी बायोलॉजिकली जन्माला घाला, म्हणजे मी माझं अवतारकार्य सुरू करतो. तर ते मला म्हणाले की आपल्याकडे तेवढा वेळ नाही. बायोलॉजिकल, लॉजिकल अशा गोष्टींचा तू अजिबात विचार करू नकोस. मी म्हटलं ठीक आहे, जातो.

**भारतात जायचं ते ठीक, परंतु मी किती वर्षांचा म्हणून जायचं ते काही ठरेना. कारण तरुण वयाचा म्हणून गेलो तर हा अचानक कुठून आला वगैरे प्रश्न निर्माण होतील. मग असं ठरलं की सामान्य माणसं जशी बाळ म्हणून जन्माला येतात त्याच वयात मी जन्माला यायचं. मी ते कबूल केलं, परंतु शाळा, कॉलेज असल्या भानगडीत मला पाडू नका, असंही सांगून टाकलं, ते त्यांनी ऐकलं. मी तेव्हा काही तासांचा वगैरे असेन. बेडवर पडून हातपाय हलवत जोरजोरात रडत होतो. निष्क्रिय पडून राहायला मला आवडत नाही, तेच सांगण्याचा प्रयत्न करत होतो. ते पाहून एक नर्स जवळ आली आणि म्हणाली, 'अहो बाळ रडतंय ना..!' ते ऐकताच मी तिच्यावर ओरडलो, 'बाळ काय म्हणतेस, नमो म्हण.' आता मला त्या नर्सचं नाव आठवत नाही, हॉस्पिटलचं नावही आठवत नाही.**

जिथं लोक जन्मतःच खूप शहाणे असतात अशा गावी मला पाठवा, म्हणजे 'हा लहान वयात एवढा शहाणा कसा' वगेरे प्रश्न कुणाला पडणार नाहीत, असं मी सांगितलं होतं. त्यामुळे मी आधी थेट पुण्यातच आलो होतो. परंतु पुण्यात अनेक ठिकाणी 'आमची कुठेही शाखा नाही' असं लिहून ठेवलेलं होतं, आणि मला तर सांगण्यात आलं होतं की तू शाखेत जायचं आहे. तेवढ्यात मला शरद पवार भेटले, तेव्हा ते दहा वर्षांचे असतील. मी त्यांचं बोट धरलं आणि त्यांना गुरू केलं. त्यांनी मला वडनगरच्या दिशेनं पाठवलं. त्यांना मी स्पर्धेत नको होतो म्हणून त्यांनी मला तेव्हा जन्मालाही यायच्या असलेल्या महाराष्ट्राबाहेर पाठवलं, हे माझ्या फार उशिरा लक्षात आलं. नियमानुसार जन्माला आलेली माणसे आणि माझ्यासारखी खास पाठवली गेलेली माणसे यांच्यात फरक असतो हे लक्षात न आल्यामुळे अनेक जण गल्लत करतात. मी ज्या काळात डिजिटल कॅमेरा वापरला असं म्हणतो, त्या काळात डिजिटल कॅमेरा जन्मालाच आला नव्हता, असं ज्ञान अनेकांनी त्यामुळेच पाजळलं. मी तो वापरून, त्यात काही सुधारणा सुचवल्या असतील आणि मग त्याचा शोध लागल्याचं जाहीर करण्यात आलं असेल, असा साधा विचार कुणाच्याच डोक्यात कसा येत नाही, कोण जाणे!

शहीद भगतसिंग यांच्यासाठी मी तुरुंगात घरचे जेवण घेऊन गेलो होतो, असा एक फोटो मध्यंतरी सगळीकडे व्हायरल झाला होता. त्यावर अनेकांनी काय काय लिहून टाकलं. माझा जन्म व्हायच्याही आधीच भगतसिंगांना फाशी झाली होती म्हणे. खरं तर वयाच्या पासष्टाव्या वर्षी मला आपलं सहज वाटलं की तेव्हा आपण असतो तर नक्कीच त्यांना भेटायला तुरुंगात गेलो असतो. माझ्या मनातील त्या कल्पनेचं ते छायाचित्ररूप होतं. तेव्हा मी एआयचं तंत्रज्ञान डेव्हलप करत होतो, एआयला पूर्ण बुद्धी तोवर मी दिली नव्हती, त्यामुळेच त्या फोटोत

**भगतसिंग तरुण दिसतात आणि मी ६५ वर्षांचा दिसतो. एका चहावाल्याकडे काम करत असतानाच मला सवय लागली, कप उंच फेकायचा आणि झेलायचा. चहावाला सतत ओरडायचा, अरे फेकतोस कशाला? पण मला फेकायला आवडायचं. एकदा मी असाच कप उंच फेकला आणि माझा तोल गेला. मला वाटलं की तो आता पडणार आणि फुटणार. परंतु एक मुलगा चटकन् पुढं आला आणि त्यानं तो झेलला. अमितची आणि माझी ती पहिली भेट होती. तेव्हाच आम्ही ठरवलं, मी फेकायचं आणि त्याने झेलायचं हेच आपण पुढे सुरू ठेवू. त्याच काळातली गोष्ट आहे. एकदा अमितकडे एक मळकी, थोडी जुनी नोट होती. आम्हाला फाफडा खायचा होता, पण कोणताच दुकानदार ती नोट घ्यायला तयार होत नव्हता. शेवटी आम्ही एक शक्कल लढवली, आधी फाफडा खाऊन टाकला आणि मग नोट दिली. अनिच्छेनं का होईना, दुकानदाराला ती नोट घ्यावी लागली. तेव्हाच मी ठरवलं, एक दिवस मी असं काही करेन, की संपूर्ण देशातल्या नोटांना कागदाएवढीही किंमत राहणार नाही. सगळं काही मी वरून ठरवूनच आलो होतो, आलो होतो म्हणण्यापेक्षा मला पाठवलं गेलं होतं म्हणा. परंतु फार लहान वयात पंतप्रधान होणं बरं दिसलं नसतं, म्हणून मीच म्हटलं की साठीनंतर बघू, त्या आधी मुख्यमंत्री होऊन थोडी प्रॅक्टिस करतो...**

पुढे सगळं काही ठरल्याप्रमाणे किंवा ठरवल्याप्रमाणे झालं. पहा ना, बघता बघता ७५ वर्ष झाली मला इथे येऊन. मोहनरावही पंचाहत्तरचे झाले आहेत, त्यांना फार कौतुक पंचाहत्तरीचं, त्याचं त्यांना ठरवू देत पुढे काय ते. माझं तर सगळं ठरवूनच आलेलं आहे येताना. येतानाच मला एक खास खोडरबर देण्यात आला होता आणि सांगण्यात आलं होतं की तुला नवं चित्र काढायचं आहे, आधीचं चित्र नीट पूसून टाक आणि कागद स्वच्छ करून घे. जेवढा म्हणून इतिहास खोडून काढता येईल तेवढा मी खोडून काढत आहे. कधी कधी जुनं-नवं असा फार घोळ होतो माझा, आणि इतरांनी केलेल्या बऱ्याच गोष्टी मीच केल्या असं मला वाटू लागतं. पण खरं तर त्या मीच केल्या आहेत...त्यात 'वाटू लागलं' कशाला म्हणायचं ?

लिहिण्याची एवढी छान लिंक लागलेली असताना, हा कोण सतत फोन करतो आहे? बघूनच टाकतो एकदाचा. अरे? डोलांडचा फोन आहे. मला विचारल्याशिवाय याला एकही निर्णय घेता येत नाही का? सतत आपलं याचं काय करू, त्याचं काय करू... ठीक आहे, बोलूनच घेतो. बाकीचं नंतर लिहितो

– *तंबी दुराई* (महाराष्ट्र टाईम्सच्या सौजन्याने...)

## व्यथित मणिपूर आणि विकासपुरुष पंतप्रधान!

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मणिपूर भेटीने, राज्यातील दीर्घकाळ चाललेल्या संकटाकडे दुर्लक्ष करण्याच्या त्यांच्या कार्यशैलीवर अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. २०२३च्या मे महिन्यात सुरु झालेल्या मैतेई आणि कुकी समुदायांमधील जातीय हिंसाचाराने, २६०हून अधिक लोकांचा बळी घेतला, स्त्रियांच्या नग्न धिंडी काढले गेल्या, खुलेआम बलात्कार केले आणि नंतर बलात्कारीत पिडीतांना गोळ्या घातल्या गेल्या. हजारो विस्थापित झाले आणि राज्य दोन भागांत विभागले गेले; तरी, मोदींनी तब्बल २८ महिन्यांनंतर १३ सप्टेंबर-२०२५ रोजी प्रथमच राज्याला भेट देण्याची सुबुद्धी सुचावी ना? त्यांचा हा विलंब केवळ अपयश नाही; तर, केंद्र सरकारच्या प्राथमिकतांचा अभाव दर्शवतो. मणिपूरसारख्या सीमावर्ती राज्यातील अस्थिरता, राष्ट्रीय सुरक्षेला धोका असतानाही इतका उशीर? मोदींच्या भेटीत कुकीबहुल चुराचंदपूरमधील शांतताभूमी आणि मैतेईबहुल इंफाळमधील कांगला किल्ल्याला भेट देणे प्रतीकात्मक होते; पण, ते खरोखरच समेटाचे प्रयत्न होते की, फक्त छायाचित्रांसाठीचा कार्यक्रम?

**विकासकामांच्या ७,३०० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे उद्घाटन करुन, ते 'शांतता आणि समृद्धी'चा संदेश देत असताना, प्रत्यक्षात हिंसाचाराच्या मूळ कारणांवर म्हणजे; जमीन-हक्क, आरक्षण आणि सीम ावाद यावर त्यांनी काहीही ठोस उपाय सुचवले नाहीत. विकासाचे गाजर दाखवणे, हे संकट सोडवण्याचे साधन आहे; की, फक्त राजकीय लाभासाठीची युक्ती? विरोधी पक्षांनी या भेटीला 'टोकनिझम' आणि 'जनतेचा अपमान' म्हटले आहे, ते योग्यच आहे. कारण, मोदींच्या भाषणात विकासावर भर असला तरी; न्याय, पुनर्वसन आणि विश्वास पुनर्स्थापनेसाठी कोणतेही ठोस आश्वासन त्यांनी दिलेले नाही. विस्थापितांच्या भेटीदरम्यान व्हिडिओ संपादित करुन आवाज काढण्याच्या आरोपांनी, माध्यम-व्यवस्थापनाच्या मुद्द्यावरही प्रश्न उभे राहतात. सरकार खरे बोलण्यापासून का घाबरते?**

स्थानिक प्रतिक्रिया मिश्र आहेत, काहींना आशा आहे; पण, अनेकांना निराशा... कारण, भेटीनंतरही दंगली, कर्फ्यू आणि विरोध सुरुच आहे. मोदींची कार्यशैली नेहमीच, विकासकेंद्रित आणि दूरदृष्टीची म्हणून सादर केली जाते; पण, मणिपूर प्रकरणात ती निवडक उद्योगपतींसाठी राजकीयदृष्ट्या प्रेरित असल्याचे स्पष्टपणे दिसते. राष्ट्रपती राजवटीतही शांतता प्रस्थापित होत नसताना, मोदींनी सर्वपक्षीय बैठक घेऊन सर्वसमावेशक चर्चा का सुरु केली नाही? हा प्रश्न मोदींच्या नेतृत्वशैलीच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह उभा करतोच... की, संकटकाळात तात्काळ हस्तक्षेपाऐवजी, उशिराने होणाऱ्या या फक्त 'पीआर' मोहिमा आहेत? एवढंच की, मोदींच्या या भेटीने मणिपूरला मदत होईल; की, फक्त मोदींच्या प्रतिमेला? हे प्रश्न एवढे उघड आहेत की, त्यावर वेगळे भाष्य करायची गरजच नाही.

*....जगदीश काबरे*

# डोनाल्ड ट्रम्प यांच्या, १ लाख डॉलर वार्षिक व्हिसा चार्जेसना समजून घ्या...

एखाद्या भारतीय किंवा भारतात काम करणाऱ्या अमेरिकन कंपनीला किंवा एखाद्या अमेरिकन कंपनीला काही कर्मचारी हवे आहेत. ते त्यांची भरती करतात. त्यांचे एच-वन-बी व्हिसा चार्जेस मुख्य कंपनी भरते, त्यासाठी कंपनीकडून लागणारे पत्र अमेरिकन दूतावासाला दिले जाते आणि मग हा एच-वन-बी व्हिसा मिळालेला भारतीय तंत्रज्ञ अमेरिकेत जातो आणि आपली सेवा सुरु करतो.

एक 'Hypothetic' आकडा सांगतो. समजा, त्याला अमेरिकेत १०,००० डॉलर्स पगार मिळणार आहे, भारताच्या तुलनेत हा ८.५० लाख रुपये महिना होतो. अर्थात, वर्षाचे १ कोटी रुपये; तर, तो अत्यंत खुश आहे... परंतु, हीच सेवा एखाद्या अमेरिकन तंत्रज्ञाने द्यायची असेल; तर, त्याचे मूल्य १५/२० कदाचित, २५,००० डॉलर्सपेक्षाही अधिक गेले असते. त्याला कारण आहे, अमेरिकेतील किमान वेतन कायदा. या कायद्यामुळे अमेरिकन नागरिकांना कोणत्या कामासाठी किती पगार दिला गेला पाहिजे, याचे सुस्पष्ट नियम आहेत आणि त्यानुसार या कंपन्यांना भारतीय तंत्रज्ञ अल्प किंवा अत्यल्प मूल्यावर काम करायला मिळत होते. भारतीय इंजिनियर मंडळींचा अमेरिकेत उल्लेख, उगीच 'टेक-कुली' असा होत नाही. भारतातील भारतीय कंपन्या, भारतातील अमेरिकन कंपन्या आणि अमेरिकेतील अमेरिकन कंपन्या या सगळ्यांनी या पद्धतीने आजवर समस्त भारतीय अभियंत्यांचे शोषण केले आहे. परंतु, रुपये डॉलरमधील फरकामुळे हे माहिती असले तरी, कोणताही अभियंता सुद्धा तक्रार करत नव्हता. सोप्या शब्दात सांगायचे असेल तर, एखादे आय. टी.मधील काम १०० तासांत होऊ शकते, असे अमेरिकन ग्राहकाचे मत असेल आणि त्याचे अमेरिकन पगाराच्या नियमांनुसार मूल्य २५ डॉलर्स प्रती तास असे असेल तर, भारतीय कंपन्या हेच काम २० डॉलर्समध्येच करायला तयार होत असत आणि हे काम भारतात राहून होणार असेल तर, भारतीय अभियंत्यांना याचे ५ डॉलर्स मिळत असत आणि अमेरिकेत राहून काम केले तर, त्याचे १५ डॉलर्स मिळत असत. हे सगळे मी ढोबळ आकडे सांगतो आहे... याला शब्दशः घेऊ नका... थोडक्यात हा पगारातील फरकाचा भारतीय कंपन्यांना कट मिळायचा आणि अधिक नफा मिळायचा, त्यामुळे आपल्या आय.टी. कंपन्या प्रचंड पैसे छापत होत्या आणि स्टॉकमार्केटमध्ये सुद्धा धूम होती.

दुसरीकडे अमेरिकेला स्वस्तात तंत्रज्ञ उपलब्ध होत होते, तिथल्या स्थानिक कंपन्यांचा फायदा होता. क्षेत्रफळ या दृष्टीने अमेरिका खूप मोठी आहे, त्यामानाने लोकसंख्या कमी. त्यामुळे, लक्षावधी भारतीय, अमेरिकेत नोकरी करायला जात होते, त्यापैकी बरीच मंडळी स्थायिक होत होती तरी, अमेरिकेला काही फरक पडत नव्हता. मुळातून समृद्ध देश, डॉलरच्या जागतिक महत्त्वामुळे तिजोरी भरलेली होती. अमेरिकेत सामान्य नागरिकांना सरकार प्रचंड सोई-सुविधा प्रदान करते, त्यामुळे आपल्या देशात हे 'टेक-कुली' येऊन नोकरी करत, पोट भरत पाय रोवत आहेत, याचे अमेरिकन नागरिकांना सोयरसूतक नव्हते.

परंतु, आर्थिक सुबत्तेला दणके बसू लागले आणि मग सगळे खडबडून जागे झाले. तुमच्या नोकऱ्या भारतीयांना लुबाडू देणार नाही, हे ट्रम्प यांचे निवडणूक आश्वासन होते, आता ते त्याची पूर्तता करत आहेत.

आज ज्यांच्याकडे एच-वन-बी व्हिसा आहे, काही काळासाठी वैध आहे. त्यांना कशाची सुद्धा चिंता नाही. त्यांचा व्हिसा संपायची वेळ येईल, त्यावेळी त्यांच्या गुणवत्तेच्या बळावर त्यांची अमेरिकन कंपनी यांच्यासाठी एक लाख डॉलर खर्च करायचे की, नाही याचे मूल्यांकन करेल आणि माझा अंदाज चूक नसेल तर, ५०% मंडळींचे व्हिसा रिन्यू सुद्धा होतील. राहिलेल्या ५०% मंडळींना मात्र, परत येण्याची वेळ येऊ शकते.

त्याचप्रमाणे भारतातून इन्फोसिस आणि अन्य आय.टी. कंपन्या विमाने भरभरुन तिथे स्टाफ पाठवत होत्या, त्याला ५०% आळा बसेल. जिथे आवश्यक असेल तिथे, कंपन्या १ लाख डॉलर भरुन सुद्धा माणसे पाठवतीलच. अर्थात, भारतातून जाणारी मंडळी ५०% कमी होईल, ५०% जातील.

भारतातील समस्त आय.टी. कंपन्यांचा नफा प्रचंड कमी होऊ शकतो. आय.टी. कंपन्यांचे शेअर्स कोसळू शकतात. याचा पहिला दणका उद्याच बसेल. ट्रम्पला शिव्या घालून, त्याला नालायक ठरवून आणि अमेरिकेची वाट लावेल ही भविष्यवाणी करुन झाली असेल तर, आता पुढील भाग वाचा... अर्थशास्त्राचा एक अत्यंत महत्त्वाचा सिद्धांत आहे... एकाच वस्तूचे, एकाच सेवेचे मूल्य जर भिन्न-भिन्न असेल तर, तिथे भ्रष्टाचार शंभर टक्के होतो.

अमेरिकेतील आय.टी. सेवा, तिचे अमेरिकन नागरिकांना मिळणारे मूल्य आणि एच-वन-बी व्हिसाधारकांना मिळणारे मूल्य यात प्रचंड तफावत होती. तिथले राजकारणी, कंपन्यांचे मालक, भारतातील कंपन्यांचे मालक आणि भारतातील राजकारणी आपापल्या फायद्यासाठी या मुद्द्यावर सोईस्कर मौन बाळगून होते; कारण, प्रत्येकाला यात आपापला स्वार्थ साधता येत होता. सगळा सिद्ध साधकांचा खेळ होता. कंपन्या प्रचंड नफा कमावत होत्या. त्यातील हिस्सा अमेरिकन राजकारणी मंडळींना मिळत होता. भारतीय कंपन्या प्रचंड पैसा कमावत होत्या. शेअर मार्केटच्या माध्यमातून, सामान्य लोकांना लाभ होत होता... अर्थव्यवस्था मजबूत होत होती, त्यामुळे भारतीय राजकारणी सुद्धा खुश होते. जोडीला भारतात ही मंडळी राहिली असती तर, आरक्षणाचे प्रमाण वाढवण्याचा आणि त्यामाध्यमातून आपले राजकीय दुकान चालवण्याचा खेळ आजवर गुंडाळण्याची वेळ आली असती, ते टळत होते. बुद्धिमान मंडळी देश सोडून जात होती आणि कमी बुद्धिमान मंडळी प्रशासनात भरून राजकारणी मंडळींना देश लुटता येत होता..

थोडक्यात, सगळ्यांचे भले होत होते आणि 'टेक-कुली' मंडळी सुद्धा भारतातील आरक्षणाच्या स्पर्धेत नोकरी मिळणे कठीण, इतका पगार मिळणे कठीण, म्हणून हे सगळे समजत असूनही 'द ग्रेट अमेरिकन ड्रीम'च्या आहारी जाऊन आपली बुद्धिमत्ता दुसऱ्या देशाचे भले करण्यासाठी आणि या सगळ्या नेटवर्कला पोसण्यासाठी खर्च करत होते.

डोनाल्ड ट्रम्प या अपारंपारिक राजकारण्याने सगळ्यांचीच गोची करुन ठेवली आहे. ट्रम्प यांच्या निर्णयामुळे भारताबाहेर जाणारी मंडळी ५०% कमी होणार. भारताबाहेर गेलेल्या मंडळींपैकी, व्हिसा कालावधी संपलेल्या मंडळींपैकी ५०% मंडळी परत येणार... इतक्या बुद्धिमान लोकांना योग्य नोकरी, व्यवसाय प्रदान करणे आणि अमेरिकेच्या इतके नाही; पण, त्याच्या ५०% तरी उत्पन्न कमावता येईल अशी संधी उपलब्ध करुन देणे हे, भारत सरकार समोरचे सर्वात मोठे आव्हान आहे.

नरेंद्र मोदींनी आज दिलेला स्वदेशीचा नारा, त्या दृष्टीने आणि त्या अर्थाने समजून घेणे आवश्यक आहे. या बुद्धिमान लोकांचा, देशातील जॉब यंत्रणेवर आणि स्वयंरोजगार यंत्रणेवर निर्माण होणारा दाब लक्षात घेता, आरक्षण धोरण कायमचे रद्द करा हे सरकारवर दडपण निर्माण करण्याची ही सर्वात उत्तम वेळ आहे, हे समस्त राष्ट्रभक्त नागरिकांनी समजून घेणे आवश्यक आहे.

**या घटनाक्रमामुळे अजून काय-काय घडेल...???**

स्टॉकमार्केटची सूज उतरेल. मुख्यत्वे आय.टी. कंपन्यांचे स्टॉक कोसळतील आणि काही काळाने स्थिर होतील. बांधकाम उद्योगाला दणका बसेल. शहरातील गृहप्रकल्पांना दणका बसेल. बांधकामक्षेत्राची सूज उतरेल. या सगळ्या समस्येकडे बघण्याचा एक वेगळा दृष्टीकोन देतो, तो पण लक्षात घ्या... मुंबईत गिरण्यांची संख्या वाढल्यावर, कोंकण भागातून चाकरमानी आले. त्यांचे पगार आणि तत्कालीन स्थानिक मुंबईकरांचे पगार यात तफावत होती. पुढे गिरण्या बंद पडल्या आणि बांधकाम उद्योग फोफावला, त्यावेळी चाकरमानी आणि स्थानिक मुंबईकर मागे पडले आणि स्वस्तात काम करणारे यूपी-बिहारी आपल्याकडे आले. हॉटेल व्यवसायात अण्णा लोक घुसले. पुढे जाऊन बांधकाम व्यवसायाला आय.टी.ची सूज चढल्यावर, यूपी-बिहारी येणे सुद्धा पुरेना, त्यावेळी आपल्याकडे बांगलादेशी आणि रोहिंग्या घुसवले गेले. आपल्याकडील कष्टाची कामे, जातीनिहाय कामे, आपल्या लोकांनी करणे बंद केले. ते सगळे व्यवसाय मुसलमान लोकांनी काबिज केले आहेत. आता फळवाला, भाजीवाला, मासळी विकणारा, पंक्चर काढणारा, कटींग करणारा, खाटीक सगळे मुसलमान आहेत. या क्षेत्रातल्या समस्त हिंदू मंडळींची उपस्थिती नगण्य झाली आहे.

जे अमेरिकेत घडले आहे, तेच भारतात सुद्धा घडले आहे, घडते आहे. भविष्यात कधी ना कधी आपल्या देशात सुद्धा एकेका मुख्यमंत्र्याला, पंतप्रधानाला असेच निर्णय घ्यावे लागतील. बांगलादेशी, रोहिंग्या हाकलून द्यावे लागतील आणि स्थानिकांना रोजगार द्यावा लागेल... स्थानिकांना हे रोजगार स्विकारण्याची लालूच द्यावी लागेल. त्यांना श्रमसंस्कृती आत्मसात करण्यासाठी प्रेरित करावे लागेल. स्थलांतरित, शरणार्थी आणि घुसखोर या तीन समस्या आहेत. या समस्यांचा सामना प्रत्येक देशाला करावा लागतो आहे. प्रत्येक राज्याला करावा लागतो आहे. प्रत्येकजण आपापल्या पद्धतीने या समस्येशी लढतो आहे. परंतु, हा प्रश्न बहुअंगी आहे. यावर एकांगी विचार करणे चुकीचे ठरेल !!!

*...सुजीत भोगले.*

# पृथ्वीवरील असाधारण तापमानवाढ लक्षात घेऊन, मेट्रो प्रकल्प रद्द करा, वृक्षतोड थांबवा!

जागतिक हवामान संघटनेच्या अहवालात म्हटले आहे की, २०१५ सालच्या मे महिन्यात, पृथ्वीवरील कार्बनडाय ऑक्साईडने ४०० पी.पी.एम.(१ पी.पी.एम.=३००कोटी टन) ही धोक्याची पातळी ओलांडली. त्याचा अर्थ, यंत्र व उद्योगपूर्व काळाच्या म्हणजे, इ.स. १७५०च्या तुलनेत, कार्बनडाय ऑक्साईडच्या प्रमाणात ४३%ने वाढ झाली. धोकादायक वातावरण बदल सुरु झाला आहे.

२१व्या शतकातील सर्व १६ वर्षे, पृथ्वीवरील सर्वाधिक उष्णतेची वर्षे होती. २०१६ हे वाढत्या उष्णतेचे सलग ३रे वर्ष होते. जागतिक हवामान संघटनेच्या, दि. २३ मार्च-२०१७च्या अहवालात धोक्याची सूचना वा ताकीद देऊन म्हटले आहे की, आत्यंतिक उष्णतेचे पर्व २०१७ पासून चालूच आहे. आमचे बदलत्या हवामानाबाबतचे आकलन अपुरे ठरत असून, आपण अज्ञाताच्या प्रदेशात प्रवेश केला आहे. bnormal is new normal! अनेक दुर्घटनांपैकी मे ते जुलै-२०१६ पर्यंत जळत राहिलेला, कॅनडातील फोर्ट मॅकमुरे येथील आजपर्यंतचा सर्वात मोठा वणवा किंवा केनियातील भीषण अवर्षण व दुष्काळ ही याची उदाहरणे आहेत. प्रतिवर्षी ०.२०ओसे. प्रमाणे ५ वर्षांत १ओसे या गतीने पृथ्वीच्या इतिहासातील कोट्यवधी वर्षांत, कधीही न घडलेली अभूतपूर्व महाविस्फोटक तापमानवाढ सुरु झाली आहे.

मानवजात वाचवण्यासाठी इ.स. १७५०च्या तुलनेत २ओसे.ची वाढ होऊ देता कामा नये, असे पॅरिस-करार म्हणतो. परंतु, सध्याच्या गतीने ही वाढ पाहता, फक्त ४ वर्षांत 'पॅरिस-करार' अयशस्वी ठरत आहे. मानवजात व जीवसृष्टी या शतकात, बहुतेक फक्त पुढील ५० ते ७० वर्षांत नष्ट होणार आहे. उष्म्याच्या लाटा, अवर्षण, दुष्काळ, अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, महापूर, वादळे, वणवे, ध्रुवांवरील व पर्वतांवरील हिमनद्यांचे वितळणे या दुर्घटना इशारा देत आहेत. तापमानवाढ अनियंत्रित व अपरिवर्तनीय झाली आहे....

पृथ्वीच्या वातावरणातील कार्बनडाय ऑक्साईड कमी करुन, प्राणवायू वाढवण्याचे व त्याद्वारे मानवासारख्या प्राण्यांच्या जीवनास अनुकूलता निर्माण करण्याचे काम, हरितद्रव्याने म्हणजे, जमिनीवरील जंगल आणि सागरातील वनस्पतीनी व हरितसूक्ष्मजीवांनी केले. आज याबद्दल कृतज्ञता बाळगून, या हरितद्रव्याचे रक्षण करण्याची गरज आहे. आता प्रत्येक झाड महत्त्वाचे आहे. यात कोणतीही अतिशयोक्ती नाही. यापुढे कार्बन उत्सर्जन शून्यावर आणण्याची गरज आहे. त्याचवेळी असलेला कार्बन शोषणारे हरितद्रव्य वाढीस लागावयास हवे; तरच, मानवजात वाचण्याची शक्यता आहे. जर आताप्रमाणे औद्योगिकरण व शहरीकरण आणि अर्थव्यवस्था चालू राहिली तर, कार्बन उत्सर्जन होत राहणार व जंगल आणि सागरातील हरितद्रव्याचा नाशही चालूच राहणार. म्हणून, सध्याची वाचण्याची पूर्वअट, औद्योगिकरण व शहरीकरण थांबणे ही आहे.

वेळ फार थोडा उरला आहे. ही क्रिया तात्काळ सुरु व्हावी. अजुन काही वर्षे गमावली तर, कोणताही उपाय करुनही आपण वाचणार नाही व आता जी माणसे म्हणतात की, औद्योगिकरण कसे थांबणार? ते थांबवले तर आम्ही जगणार कसे? त्यांनी हे लक्षात घ्यावे की, आपणास पृथ्वी व निसर्ग जगवतो, औद्योगिकरण नव्हे. सर्व शहरे अन्नामुळे जगतात. जे औद्योगिकरण थांबण्याची कल्पना त्यांना आता रुचत नाही, ते पृथ्वीचे तापमान वाढत गेल्यावर, येत्या ५ ते १० वर्षांत कोसळणार आहे. पण, तेव्हा परतीचा, वाचण्याचा मार्ग बंद होईल, कोट्यवधी वर्षांच्या जीवनाच्या प्रवासात (३९० कोटी वर्षे) काही कोटी वर्षांत, मानवजात उत्क्रांत झाली. दोन ते अडीच लाख वर्षे सध्याच्या जडणघडणीचा माणूस आहे. फक्त १० ते १२ हजार वर्षांत माणसाने जंगल व माळराने सोडून



स्थैर्य देणारी शेती सुरु केली. त्यातही कार्बनचे वातावरणातील विशिष्ट प्रमाण व त्याजोगे सुयोग्य तापमान सहाय्यभूत ठरले याची जाणीव ठेवण्याची गरज आहे. त्यानंतरचा फक्त २५० वर्षांचा, यंत्रे व वस्तूंचा व त्यामुळेच चलनाचा खेळ होण्याचा, पैशाचे प्रस्थ माजण्याचा हा बुडबुड्यासारखा काळ अत्यल्प आहे.

सुमारे १० हजार वर्षांचा शेतीचा काळ हा सुवर्णमध्य आहे. पुन्हा त्या उर्जाविरहित पध्दतीचा अवलंब केल्यास आणि अन्न, वस्त्र व निवारा यांच्या शाश्वतपध्दती पुन्हा अंगिकारल्यास मानवजात व जीवसृष्टी अस्तित्वात राहू शकते.

मुंबईतील मेट्रो, सागरी रस्ता, दर दहा किलोमीटरवर प्रचंड बंदर असलेला सागरमाला प्रकल्प, नवी मुंबई विमानतळ, समृध्दी व इतर महामार्ग, गुहागर व राजापूरचे तेलशुध्दीकरण कारखाने, १४८३ कि.मी. लांब व ३०० कि.मी. रुंदीचा, सुमारे ४००० परदेशी कारखान्यांचा अंतर्भाव असलेला, सहा राज्यातुन जाणारा दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉर व तसे देशभरातील इतर ५ औद्योगिक कॉरिडॉर, 'जैतापूर' व इतर अणुऊर्जा प्रकल्प, पश्चिम घाट व ईशान्य भारतातील जंगलाचा नाश, अशा स्वरुपाच्या औद्योगिकरणाच्या योजना प्रस्तावित आहेत. या सर्व प्रकल्पांत शेकडो कोटी झाडे व जंगल नष्ट होणार आहे. नद्या, झरे, विहिरी, सागर प्रदुषित होणार आहेत. भूजल पातळी खूप खाली जाणार आहे. डोंगर-पर्वत नष्ट होणार आहेत. प्रचंड कार्बन उत्सर्जन होणार आहे.

वर उल्लेख केलेल्या, पृथ्वीवरील तापमानवाढीच्या पार्श्वभूमीवर, असे प्रकल्प आणले जाणे हे धक्कादायक व आश्चर्यजनक आहे. कारण, खरेतर आज चालू असलेले औद्योगिकरण व शहरीकरण थांबण्याची आवश्यकता आहे. या विनाशकारी आधुनिकतेचा प्रत्येक घटक धोकादायक आहे. उदा. एक टन सिमेंट तयार करताना, अर्धा टन कार्बनडाय ऑक्साईड वातावरणात जातो व सुमारे अडीच ते तीन हजार टन पाणी वापरले जाते. आपणास जीवनाशी निष्ठा ठेवून, सर्व प्रस्तावित प्रकल्प रद्द करुन पूर्ण पृथ्वीला 'ना विकास क्षेत्र' म्हणून जाहीर करण्याची व तसे वर्तन करण्याची गरज आहे.

आजूबाजूला घडणाऱ्या व आपणास वस्तुस्थितीचा विसर पाडून भ्रमात ठेवणाऱ्या घडामोडींमधून अलिप्त होऊन विचार केला; तर, आपल्या मुलाबाळांच्या रक्षणासाठी काय योग्य आहे ते लक्षात येईल. निसर्गाशी उभा दावा मांडणारी जीवनशैली सोडून देऊन, पृथ्वीशी सुसंगत बनण्यातच हित आहे.

सध्या मराठवाड्यात शेतकरी दिवसा बाहेर पडू शकत नाही. तेथे, विदर्भ-नागपूरात, तापमान ५०अंशांच्या वर जात आहे. अन्न पिकवणारे शेतकरी, पशु-पक्षी, धान्यासह वनस्पती भाजून निघत आहेत. मात्र, ज्यांचा निसर्गाशी व त्यांच्या सृजनाशी काडीमात्र संबंध नाही, ती औद्योगिक-शहरी व्यवस्थेतील माणसे, कृत्रिम वातानुकूलन वाढवून बेपर्वाई दाखवत आहेत. आपले खरे घर पृथ्वी आहे, ते तापत असताना, हे आधुनिक जीवनशैलीचे चोचले फार काळ चालणार नाहीत, याची त्यांना जाणीव नाही. 'जीवन की जीवनशैली' , 'मोटार की मान्सून' हा प्रश्न आहे.

***जीवन हे जीवनशैलीपेक्षा महत्त्वाचे आहे.***

***औद्योगिकरण थांबवा - जीवन वाचवा***

***ॲड गिरीश राऊत***

निमंत्रक : भारतीय पर्यावरण चळवळ

## ...'राजकीय-अंधश्रद्धा' समाजाचं अधिक नुकसान करतात! - राजन राजे

...पृष्ठ क्र. १ वरुन

'मराठी-माणसां'चं, जे महागड्या शहरांमधून निवासाची व व्यवसायाची संधि उपलब्ध नसल्यामुळे, बहुतांश दूरवर रहाणारे कामगार आहेत, त्यांचं भलं होणं शक्यच नाही, हे एखादं गल्लीतलं शेंबडं पोरं पण जाणतं... पण, मी मी म्हणणारा कुठलाही मराठी-नेता, ज्यांच्याविषयी मराठी भाबडी जनता 'राजकीय-अंधश्रद्धा' बाळगून असते, असल्या व्यवस्थेच्या गाभ्यातील अथवा 'मराठी-जगण्या'च्या आसाला भिडलेल्या मुद्द्यांवर चुकूनही काम करणं तर सोडाच, साधा उच्चारही करताना दिसणार नाहीत. तेव्हा, या राजकीय-अंधश्रद्धांना जोवर आपण मराठी-माणसं 'मूठमाती' देत नाही व स्वतःला सक्षम बनवत नाही, तोवर मराठी-माणसांचं पिढ्यानपिढ्या नुकसान होतच रहाणार आहे, मराठी-माणसं गुलामीत ढकलली जातच रहाणार आहेत... मराठी-माणसानं स्वतःला सक्षम बनवणं म्हणजे, व्यक्ति आधारित कमी आणि धोरण आधारित जास्त राजकारण करणं, अशा परखड शब्दांत आपलं मनोगत व्यक्त केलं. यावेळी व्यसपीठावर, प्रमुख पाहुणे म्हणून 'एनपीएम'चे राष्ट्रीय संयोजक डॉ. संजय मं.गो., 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान'चे विश्वस्त दत्ता बाळसराफ, प्रा. मच्छिंद्र मुंडे उपस्थित होते. दरम्यान, समितीच्या ठाणे शहर शाखेचे कार्याध्यक्ष व ज्येष्ठ पत्रकार अनिल ठाणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन 'अंनिस'च्या केंद्रीय सदस्या सुशीला मुंडे यांनी केले. याप्रसंगी 'धर्मराज्य पक्षा'चे प्रसिद्धीप्रमुख व पत्रकार संजय दळवी, माहिती अधिकार ठाणे शहर अध्यक्ष अनिल महाडिक, पक्षाचे नवी मुंबईचे कार्यकर्ते नरेंद्र शिंदे आणि रामसकल भर आदी उपस्थित होते.

# कार्ल मार्क्स ते टेक्नो-फ्यूडलिझम : कामगार-मुक्तीचा प्रवास

## भाग २

"Accumulation of wealth at one pole is at the same time accumulation of misery, agony of toil, slavery, ignorance brutality, mental delegation, at the opposite pole!"...इति, कार्ल मार्क्स

प्रचलित हेगेलियन-दैववादाला ठोकरुन भौतिक-जगताला, त्याचं वास्तविक अधिष्ठान मिळवून देताना...आपल्या कल्पना-संकल्पना-आपले विचार, हे अवतीभवती घडणाऱ्या व घडून गेलेल्या घटनांचा परिपाक असतो आणि त्यांची पैदास-उगवण आपल्या हाडामांसातूनच होत असते. आपल्या आजच्या परिस्थितीला ईश्वरासारखी कुठली सर्वव्यापी-सर्वसाक्षी-सर्वशक्तिमान पारलौकिक शक्ति जबाबदार नसून; आपण स्वतःच त्याला जबाबदार असतो, हे मार्क्स ठणकावून सांगू लागला व ती परिस्थिति बदलण्याचं क्रांतिकारी आवाहन तो ठायी ठायी करु लागला.

'Classless Stateless Society' या साम्यवादी-संरचनेचं (ॲर्पिळी) स्वप्न पहाणाऱ्या कार्ल मार्क्सला...'शासकीय-भांडवलवाद' (स्टेट-कॅपिटॅलिझम), या संकल्पनेची परिपूर्ण मांडणी करण्याएवढा वेळ नियतीनं दिला नाही; त्यामुळे, "भांडवलशाहीतून समाजवाद, समाजवादातून साम्यवाद"...अवतरण्याच्या स्थित्यंतराच्या कालखंडात, लयाला जाऊ पहाणाऱ्या (State shall wither away) 'राज्यशासनाची औटघटकेची भूमिका' ठरवणं व ठरवल्या भूमिकेची संगतवार मांडणी करण्याचं अवघड शल्यकर्म पार पाडण्यापूर्वीच... व्याधिग्रस्त समाजपुरुषाच्या देहावर शस्त्रक्रिया करु पहाणारा महान 'शल्यविशारद', कामाच्या प्रचंड तणावाने स्वतःच व्याधिग्रस्त होत...काळाच्या पडद्याआड गेला, हे अखिल मानवजातीचं मोठं दुर्दैवच! त्यामुळे 'मार्क्सवाद', हा मोनालिसाच्या चित्रासारखा, मार्क्सवाद राबवणाऱ्या सत्ताधारी व्यक्तीगणिक, एक स्वतंत्र आकलनाचा विषय काहीसा बनला.

मूलतः 'भांडवलशाही व लोकशाही', या परस्परविरोधी संकल्पना असताना, मार्क्सवादाच्या विभिन्न आकलनातून "स्टॅलिन-माओच्या कालखंडात झालेल्या दुर्दैवी रक्तपाताला व कम्युनिस्टांच्या झेंड्यातील लाल रंगाला", एकाच नाण्याच्या दोन बाजू कल्पून भांडवली-व्यवस्थेनं... 'समाजवाद-साम्यवादा'ला जगभरात केवळ नाहक बदनामच केलं नाही; तर, त्याविषयी एक मोठी भ्रामक-दहशत निर्माण करुन (विशेषतः, महाराष्ट्रात कम्युनिस्टांना 'लाल माकडं' संबोधून व कृष्णा देसाईंसारख्या कम्युनिस्ट नेत्यांच्या हत्या घडवून) 'साम्यवादा'ला जनसामान्यांच्या विचारविश्वातून बाद करण्याचं महापातक केलं...त्यातूनच, कामगार-क्रांतिमैदान असलेली 'लालबाग', कधि 'दलालबाग' बनली, कुणाला कळलंदेखील नाही!

जगभरातील भांडवली-व्यवस्थेची, विशेषतः अमेरिकन भांडवली-व्यवस्थेची 'असलियत' उघडी पडणं....

शीतयुद्धाच्या कालखंडात अमेरिका, इंग्लंड, युरोपमधील अनेक भांडवली-देश, साम्यवादी (कम्युनिस्ट) देशांमध्ये मानवी-हक्कांना पायदळी तुडवलं जात असल्याबाबत व 'पोलादी-पडद्या'आडच्या (Iron Curtain) हुकूमशाही-कारभाराबाबत, कायमच कोल्हेकुई करत आलेली होती... पण, वर्ष-१९९१मध्ये 'सोव्हिएत युनियन' कोसळल्यानंतर (ज्याला, रशियन अध्यक्ष ब्लादिमीर पुतीन यांनी, "The greatest geopolitical catastrophe of the 20th century" असं संबोधलंय) व डेंग झिओपिंग यांच्या नेतृत्त्वाखाली चीनने भांडवली-अर्थसुधारणा (Economic-Reforms with Chinese characteristics) हाती घेतल्यानंतर... जगभरातलं साम्यवादाचं (कम्युनिझमचं) जणू आव्हानच संपुष्टात आलं... आणि, त्यानंतरच प्रकर्षाने अमेरिकन भांडवली-व्यवस्थेचा 'लोकशाहीविरोधी' असा भेसूर, हिंसक खराखुरा चेहरा जगाला दिसू लागला! दररोज १२० या हिशोबाने ४३,३७५ अमेरिकन माणसं, दरवर्षी बंदुकीच्या गोळीबारात मारली जातायत...तरीही, अनिर्बंध बंदुकीच्या वापरावर कडक निर्बंध घालण्याची, कुणाही एका अमेरिकन अध्यक्षाची हिंमत होऊच शकत नाही; एवढी, 'भांडवलदार' अमेरिकेतल्या 'भांडवली-व्यवस्थे'तील बंदूक-उत्पादकांची संघटना शक्तिशाली आहे. अमेरिकेतील शस्त्रास्त्र-निर्मिती करणारे लॉकहिड-मार्टिन,



रेथॉन टेक्नॉलॉजिस, बोईंग सारखे बडे बडे कारखाने चालावेत म्हणूनच, जगातली युद्धे कधिच थांबू शकत नाहीत...कारण, वेळोवेळी ढासळणारी अमेरिकन-अर्थव्यवस्था सावरुन धरण्याचं तथाकथित 'महत्कार्य', याच शस्त्रास्त्रनिर्मिती करणाऱ्या कंपन्या, परंपरागतरित्या करत आलेल्या आहेत. अफगाणिस्तान, इराक आणि लिबियामधील रक्तरंजित अमेरिकन लष्करी-हस्तक्षेप, हा 'युनो'च्या सुरक्षा-परिषदेच्या संमतीविना किंवा जसं लिबियात घडलं तसं, म्हणजे...युनोच्या ठरावाचा विकृत अथवा सोयिस्कर अर्थ लावूनच झाला होता. गाझातल्या नरसंहाराच्या रुपाने... जगातील लोकशाही व मानवी-हक्कांच्या संरक्षणाचा खोटा मुखवटा धारण करणाऱ्या, तमाम अमेरिकन भांडवली-व्यवस्थेचा आत्यंतिक क्रूर, हिडीस व अमानुष चेहरा नव्याने जगासमोर आलाय, इतकंच! "भांडवलाच्या डोक्यापासून पायापर्यंत प्रत्येक छिद्रातून रक्त आणि घाण टपकत असते", या मार्क्सच्या वक्तव्याचा जिवंत प्रत्यय, वरील घटनाक्रमातून आल्याशिवाय रहात नाही.

...केवळ स्टॅलिन, माओ यांनी केलेल्या अत्याचारांमुळे व हुकूमशाही कारभारामुळे 'साम्यवाद-समाजवाद', हे मलिन होऊच शकत नाहीत; कारण, 'लोकशाही आणि समाजवाद-साम्यवाद' एकत्रित गुण्यागोविंदाने कसं नांदतात...याचं प्रत्यंतर वर्ष-१८७१मधील 'पॅरिस-कम्यून'च्या ऐतिहासिक प्रयोगात जगासमोर आलंच होतं; पण, गुन्हेगारी-संगनमत करुन नृशंस भांडवली-व्यवस्थेनं...जवळपास २० हजाराहून अधिक निष्पाप समाजवादी-क्रांतिकारकांच्या रक्ताचे पाट वाहते करुन, तो प्रयोग अमानुष क्रौर्याने मोडून काढला आणि त्यानंतर आजतागायत, तो 'लोकशाही-समाजवादा'चा (Democratic Socialism) कमालीचा यशस्वी प्रयोग इतिहासाच्या कृष्णविवरात कायमचा दडपून टाकलाय! स्टॅलिन, माओ वगैरेंच्या दडपशाही, हुकूमशाहीतील हिंसाचारासंदर्भात (इथे सुद्धा, तत्कालीन कुठल्या जंगली परिस्थितीशी व कुठल्या अमानुष व्यवस्थेविरुद्ध स्टॅलिन, माओ लढत होते...याचाही, साकल्याने विचार व्हायला हवाच) कार्ल मार्क्सच्या 'साम्यवादा'ला (Communism) जबाबदार धरणे; म्हणजे, चर्चमधल्या अत्याचारांसाठी जीझस ख्रिस्तला किंवा मुस्लिम अतिरेक्यांच्या हिंसक कारवायांसाठी महंमद पैगंबरांना जबाबदार धरणे होय...एवढंच नव्हे तर, जपानवर टाकल्या गेलेल्या अणुबॉम्बसाठी वा आजच्या जगातल्या विनाशकारी आण्विक-शस्त्रसज्जतेसाठी आईनस्टाईनला जबाबदार धरण्यासारखं आहे...किंवा, भारतीय-राजकारणाच्या सद्यस्थितीला धरुन बोलायचं तर, आपल्या देशाच्या आताच्या अस्थिर व ढासळत्या आर्थिक-राजकीय परिस्थितीला, भाजप-संघीय राज्यकर्त्यांसारखं म. गांधी व पं. जवाहरलाल नेहरुंना जबाबदार धरण्यासारखं हास्यास्पद आहे...एकूणच, हे 'साप समजून भुई धोपटणं' आहे, एवढं निश्चित.

### साम्यवादाचा ऐतिहासिक धांडोळा व इतिहासाचं डोळस अवलोकन....

'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो'मध्ये मांडलेल्या "उत्पादनाच्या संसाधनांची व उत्पादनांची सामूहिक मालकी", वगैरे संकल्पना मानवजातीला अगदीच नव्या नव्हत्या! आपल्या तत्त्वप्रणालीसाठी प्राणार्पण करणाऱ्या

थॉमस मूर यांनी वर्ष-१५१६ मध्ये लिहीलेल्या 'युटोपिया' ग्रंथात एक बेटावर 'कम्यून' स्थापण्यात आल्याचा विचार मांडला होता; ज्यातील, सगळेच व्यवहार तार्किकदृष्ट्या व न्याय्य पद्धतीने पार पाडले जात होते. १६६७मध्ये जॉन मिल्टन याने अमेरिकन व फ्रेंच राज्यक्रांतिला प्रेरणा देणाऱ्या 'पॅराडाईज लॉस्ट' या गाजलेल्या प्रदीर्घ काव्यात राजेशाहीला विरोध करत, अशाच स्वरुपाच्या नागरी-हक्क समानतेची व प्रजासत्ताक संकल्पनांची मांडणी केली होती...आणि, त्याहीपूर्वी इसवीसनपूर्व चौथ्या शतकात प्लेटोने (भले राज्यकर्त्यावर्गापुरती का असेना); समाजहित साधण्यासाठी अडसर ठरणाऱ्या राज्यकर्त्यांच्या स्वार्थप्रेरणा व भ्रष्टाचार मुळातूनच निपटून काढण्याकामी...त्यांच्यासाठी खास खाजगी-मालमत्ता, विवाहसंस्था मोडीत काढणारी 'कम्यून्स' (Precurser to communism) स्थापण्याची संकल्पना मांडली होती.

प्रत्येक युद्धात मोठ्या संख्येनं भाग घेणाऱ्या रयतेच्या, युद्धात भाग घेण्याच्या प्रेरणांचं प्रथमच मार्क्सने खोलवर अध्ययन केलं व त्यातूनच इतिहास, ...पृष्ठ क्र. १० वर

# पुढचा बैल 'नेटा', तर मागच्याला दाखवील वाटा, या मराठी म्हणीनुसार... 'पुढचा' डोनाल्ड ट्रंप नावाचा अमेरिकी-नेता होऊन 'नेटा'...दाखवी आम्हासी मराठी-भविष्याच्या 'वाटा'...!!!

(अमेरिकेकडून H1B व्हिसा नियमांमध्ये २१ सप्टेंबरपासून मोठे बदल...या बदलांनुसार H1B व्हिसाचे शुल्क वार्षिक १०० डॉलर्सवरुन थेट १ लाख डॉलर्सपर्यंत वाढणार...स्थानिक अमेरिकी-नागरिकांना रोजगाराच्या संधि वाढणार व अमेरिकेबाहेरच्या कामगार-कर्मचारीवर्गाला तुटपुंजं वेतन देऊन, त्याद्वारे चाललेल्या कॉर्पोरेटीय-नफेखोरीला आळा बसणार...७५% H1B व्हिसाधारक, हे भारतीय आहेत, हे विशेषच!)

...दुर्दैवाने आपली राज्यघटना, केंद्र-सरकारला झुकतं माप देणारी, अशी 'Quasi-Federal' अथवा अपुरी-अधुरी संघराज्यीय-संरचना असल्याने...यापूर्वीच, पंजाब व हरयाणा उच्च न्यायालयाकडून वर्ष-२०२३ मध्ये 'राज्यघटनाविरोधी' म्हणून हरयाणा राज्य स्थानिक उमेदवारांना रोजगार कायदा-२०२० (The Haryana State Employment of Local Candidates ct, 2020...Quashed) 'रद्दबातल' (Null Void) करण्यात आलाय. परिपूर्ण संघराज्यीय-संरचने'च्या (Perfect Federal Structure) मूळ जागतिक-व्याख्येनुसार केल्या गेलेल्या सदर कायद्याने रु.३०,०००/- (रु. तीस हजार) पगाराखालील रोजगारांसाठी ७५% स्थानिकांना 'रोजगार-आरक्षण' देण्याचा स्तुत्य प्रयत्न करुन पाहिला...तसाच काहीसा कायदा प्रयत्न आजही, कर्नाटक सरकारकडून राज्यघटनेतील १४ व १९ व्या कलमांच्या असणाऱ्या मोठ्या अडसरांमुळे धूळ खात पडून आहे.

**भांडवलदारांना स्वतःचा कुठलाही देश-प्रदेश नसतो...त्यांच्या नजरेसमोर असतो फक्त, नफ्याचा 'धनादेश' आणि 'उसके लिए बस् सबकुछ'! म्हणूनच, ते जिथे जातात तिथे जगभरात स्थानिकांना यासाठीच डावलतात की, त्यांना मोठे पगार, नोकरीची शाश्वती व सोयीसुविधा द्यायला लागतात आणि ते कामगार-संघटना उभारण्यात हिरीरीने भाग घेतात.**




महाराष्ट्रातल्या मूळ मराठी कामगार-कर्मचारीवर्गाची उत्तरेतल्या आक्रमणामुळे व 'कंत्राटी-कामगार पद्धती'मुळे काय दारुण स्थिती झालीय आणि राज्यघटनेतील वरील तरतुदींचा दाखला देऊन स्थानिक-मराठ्यांच्या (जातिवाचक बिलकूल नव्हे) नोकरीच्या हक्कांवर कशी आजवर गदा आणली गेलीय, हे विषय आता चावून चोथा झालेत. जसं कार्ल मार्क्स म्हणाला होता, The philosophers have only interpreted the world in various ways, the point however is to change it...तसं, या मराठी-माणसाला त्यांच्या हक्काच्या राज्यातच, वेगाने मागे ढकलत नेणाऱ्या या मूलभूत समस्येवर तोडगा काढणं अत्यावश्यकच नव्हे; तर, ती काळाची एक निकडीची गरज आहे!

...त्यादृष्टीने, जोवर राज्यघटनेच्या मूलगामी-संरचनेत परिपूर्ण संघराज्यीय बदल होत नाहीत; तोवर, तातडीची उपाययोजना म्हणून, ट्रंपतात्यांच्या पावलावर पाऊल ठेवत... आजच्या महागाईच्या हिशेबाने दरमहा थेट (C.T.C. नव्हे) रु.५०,०००/- (रु. पन्नास हजार) पेक्षा कमी पगार घेणाऱ्या प्रत्येक 'परप्रांतीय' कामगार-कर्मचाऱ्याच्या मागे, कुठल्याही आस्थापना-कंपनी-कॉर्पोरेटला राज्य-सरकारला दरडोई प्रतिवर्ष रु.३,००,०००/- (प्रत्येक वर्षीच्या सेवाकाळासाठी दरडोई वार्षिक रु. तीन लाख फक्त) वार्षिक 'शुल्क अथवा सेवा-आकार' द्यावा लागण्याचा कायदा कराच... जेणेकरुन, साप भी मरे और लाठी भी न टूटे, या नितीनुसार महाराष्ट्रात मायमराठ्यांना नोकरी नाकारणाऱ्या भांडवली-धेंडांच्या नाकात वेसण घातली जाऊ शकेल!

...अशी स्थानिकांच्या हिताची रोखठोक भूमिका घेण्यात राज्यघटनेचा कुठलाही अडसर येऊ नये किंवा आणला जाऊ देता कामा नये...जेणेकरुन, 'विकास व समृद्धी सर्वांची' या तत्त्वानुसार महाराष्ट्र, गुजराथ, तामीळनाडू, आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा वगैरे औद्योगिक-सेवाक्षेत्राच्या दृष्टीने प्रगत असलेल्या राज्यांच्या बरोबरीने इतर मागासलेली राज्येही (विशेषतः, उत्तरेकडील यूपी, बिहार इ.) विकासाच्या प्रगतीपथावर दौड करु लागतील!

वरील संदर्भात, आम्ही 'धर्मराज्य पक्षा'तर्फे ऑनलाईन व ऑफलाईन (रस्त्यावरील आंदोलन) पद्धतीने 'मागणी-आंदोलन' करणार आहोत...महाराष्ट्रातील तमाम मराठी तरुण-तरुणींनी, समस्त मराठी कामगार-कर्मचारीवर्गाने आपल्या व आपल्या पुढील पिढ्यांच्या भविष्याच्या दृष्टीने आंदोलनात सामील व्हावं, ही संबंधित सर्वांनाच कळकळीची नम्र विनंती...धन्यवाद!

**आंदोलन-मार्गदर्शनासाठी संपर्क :**
**समीर चव्हाण** - ७०४५००२२७५
(सचिव : धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ)

**।। जय महाराष्ट्र...जय हिंद ।।**

(संयुक्त-महाराष्ट्रानंतर 'स्वायत्त-महाराष्ट्र'... राष्ट्रांतर्गत राष्ट्र, 'स्वायत्त-महाराष्ट्र'...शिवछत्रपती राष्ट्र!)

***...राजन राजे* (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)**

## Thane, Mumbai's Pride, Kshatriya-Rajput Community's Glory: Kalpana Shekhawat Wins International Beauty Crown From Thane, Mumbai to Canada: Kalpana Shekhawat Shines on the Global Stage!!

Kalpana Shekhawat, born and brought up in Thane, Mumbai and a proud daughter of Kshatriya-Rajput community, has made history by winning the prestigious crown of Mrs. Canada International Legacy 2025, powered by HKB Dreamworld. Her remarkable achievement has brought immense pride not only to the Rajput community but also to her hometown Thane, Mumbai. With grace, confidence, and a deep commitment to her advocacy, Kalpana's victory is a shining example of how cultural roots and global aspirations can unite to create true legacy. Thane, Mumbai's daughter, Kshatriya Rajput's pride crowned on Canada's stage

## ठाणे, मुंबईचा अभिमान, क्षत्रिय-राजपूत समाजाचा गौरव:

### कल्पना शेखावत यांना 'Mrs. Canada International Legacy २०२५'चा मानाचा मुकुट!

**ठाणे (प्रतिनिधी):** ठाणे, मुंबईत जन्मलेल्या आणि वाढलेल्या, क्षत्रिय-राजपूत समाजाच्या गर्वास्पद कन्या कल्पना शेखावत यांनी 'Mrs. Canada International Legacy २०२५' हा आंतरराष्ट्रीय सौंदर्य स्पर्धेचा किताब जिंकून इतिहास रचला आहे. HKB Dreamworld यांच्याद्वारे आयोजित या प्रतिष्ठित स्पर्धेत कल्पनाने आपल्या आत्मविश्वास, सौंदर्य आणि समाजकार्याच्या बांधिलकीद्वारे जागतिक स्तरावर आपली छाप सोडली आहे.






त्यांच्या या अद्वितीय यशामुळे केवळ राजपूत समाजाचा नव्हे, तर संपूर्ण ठाणे शहराचा अभिमान उंचावला आहे. कल्पनाचे हे यश हे दाखवते की, संस्कृतीची मुळे आणि जागतिक पातळीवरील आकांक्षा यांचा मिलाफ केवळ वैयक्तिक नव्हे तर सामाजिक प्रेरणाही निर्माण करू शकतो.

**ठाण्याची लेक, राजपुतांची शान आता कॅनडाच्या मंचावर ताजधारी.**

# कार्ल मार्क्स ते टेक्नो-फ्यूडलिझम : कामगार-मुक्तीचा प्रवास ...पृष्ठ क्र. ८ वरुन

**हा निव्वळ विभिन्न राज्यांच्या, राजेरजवाड्यांच्या वा भिन्नभिन्न धर्मांच्या संघर्षांतून घडलेला नसून...तो विविध आर्थिकवर्गांच्या संघर्षांतून घडला असल्याचं प्रतिपादन केलं.**

**डम स्मिथ आणि नवउदारमतवादी मंडळी....**

अमेरिकेला स्वातंत्र्य मिळत असतानाच वर्ष १७७६ डम स्मिथचं ''Wealth Of Nations'' पुस्तक प्रकाशित झालं...'व्यक्तिगत स्वार्थ साधणं' वा 'बाजारपेठेतील 'अदृश्य हात' वगैरे संकल्पना, भांडवली-व्यवस्थेत समाजाचं आर्थिक-उन्नयन करतील...असं जरी डम स्मिथने म्हटलं असलं; तरी, त्याने भांडवलदार अथवा बडे उद्योग-व्यावसायिक जेव्हा एकत्र येतात, तेव्हा ते काही समाजाच्या भल्याची चर्चा करण्यासाठी एकत्र येत नाहीत; तर, आपला स्वार्थ साधण्यासाठी व तो साधताना समाजाच्या हिताविरुद्ध कटकारस्थानं रचण्यासाठीच एकत्र येत असतात'', हे 'वैश्विक-सत्य' मुद्दाम नमूद करुन ठेवलंय.

डम स्मिथला भांडवली मक्तेदारीतून निर्माण होऊ शकणाऱ्या बाजारपेठीय निखळ स्पर्धेतील मोठ्या 'अवरोधा'ची (nti-Competitiveness) परिपूर्ण कल्पना होती. कामगारांच्या हितासाठीच केवळ, बाजारपेठेवर सरकारी-नियंत्रणाच्या (Regulation) बाजुने तो होता; तसेच, हे सरकारी-नियंत्रण भांडवलदारवर्गाच्या बाजुने बिलकूल असू नये, एवढंच म्हणून डम स्मिथ थांबला नाही; तर, ''पडद्यामागे सगळी कॉर्पोरेटीय-मंडळी, सर्वत्र कामगारांचे वेतन-पगार कमीतकमी राखण्यासाठी लपूनछपून कट रचत असतात'', असा कामगारहिताच्या दृष्टीकोनातून अत्यंत गंभीर इशाराही देऊन गेला. अमेरिकेचंच उदाहरण द्यायचं झालं तर, डम स्मिथच्या या प्रतिपादनानंतर जवळपास २०० वर्षानंतरचं हे चित्र होतं की, ''हॉलिवूड आणि सिलिकॉन व्हॅलीतील बडे उद्योगपती एकत्रित येऊन, जे कामगार-कर्मचारी त्यांच्या झोळीत बेफाम नफ्याच्या ओंजळी सतत ओतत होते; त्यांच्याच वेतन-सोयीसुविधांचं खच्चीकरण करण्याच्या योजना आखत होते''.

याचाच सरळ अर्थ हा की, ''अगदी भांडवलशाहीचा उद्गाता असलेला डम स्मिथदेखील आपलं वेतनमान-सोयीसुविधा वाढवण्यासाठी व कामगारहक्कांसाठी कामगार-चळवळीचा बाजुने उभा होता; तसेच, कामगार-चळवळीचा खंदा समर्थक होता...आणि, 'अनियंत्रित-भांडवलशाही'च्या (UnfetterdCapatalism...Neo-Liberalism type) सक्त विरोधात होता! एवढंच नव्हे तर, तो शिक्षण-आरोग्य या जीवनावश्यक क्षेत्रांवर 'सार्वजनिक-मालकी' हवी; तसेच, सरकारनेही उद्योगधंद्यात समाजहितासाठी गुंतवणूक (Public Investment) करायला हवी, अशा मताचा होता. ''लोकसंख्या नियंत्रित राहिली नाही; तर अधिक पैदा झालेल्या मुलांना खायला अन्न मिळणार नाही आणि यालाच जीवन ऐसे नाव आहे'', असं संवेदनशून्य वक्तव्य करणाऱ्या थॉमस माल्थसपेक्षा डम स्मिथ कितीतरी अधिक समंजस व सखोल विचारवंत वाटतो, तो त्यामुळेच! म्हणूनच, जोसेफ स्टिग्लिट्झ एका मुलाखतीत म्हणाले, ''डम स्मिथला जर, 'जिमी कार्टर, रोनाल्ड रिगन, मागरिट थॅचर, मिल्टन फ्रिडमन वा फ्रेडरिक हायेक वगैरे नवउदारमतवादी लोकं (Neo-Liberals)...जगभर आपली नवउदारमतवादी-विचारसरणी लादण्यासाठी, त्याचा कसा वेडावाकडा वापर करतायत, हे कधि कळलं असतं...तर डम स्मिथ, त्यांच्या क्रूर-विकृत विचारसरणीच्या खंडनासाठी व त्यांना उघडं पाडण्यासाठी आपल्या कबरीतून उसळून ताठ उभा राहिला असता!

**भांडवलशाहीची उगमाकडून अध:पतनाकडे वाटचाल....**

पंधराव्या शतकातील पोर्तुगीजांच्या 'मदीरा' बेटावरील जंगलं जाळून साखर-निर्मितीतून सुरु झालेला भांडवली-व्यवस्थेचा आदिम प्रवास, नवनव्या शास्त्रीय संशोधनातून अठराव्या शतकानंतर अवघ्या तीन शतकातच अधिक प्रगत, व्यापकच नव्हे; तर, संवेदनशून्य-नृशंस होऊ लागला! फरक एवढाच की, त्या क्रौर्य-अमानुषतेला भांडवली प्रचारकी धाटणीचं पांढरपेशी-दांभिक गोंडस-आवरण प्राप्त झालं होतं. शास्त्रीय संशोधनाच्या कल्लोळातून उभ्या रहात असलेल्या भांडवली-व्यवस्थेची 'व्याप्ती' एवढी मोठी व सर्वंकष होत गेली की, तिनं ''पैसा, हा 'नवा परमेश्वर' जन्माला घातला'' ...आणि, त्यातून सामाजिक-नीतिमत्ता झपाट्याने काढता पाय घेऊ लागली. माणसं, अधिकाधिक 'आत्मकेंद्रित' बनू लागली...अशा आत्यंतिक स्वार्थ-संवेदनशून्यतेला 'व्यावसायिकता' (Professionalism) हे संबोधन प्राप्त झालं व अवघं मानवी-जगणं, एका दिशाहिन-अंतहिन आवर्तात सापडलं.

औद्योगिक-क्रांतिला सुरुवात झाल्यानंतर, ती 'आर्थिक-विषमते'ची जननी ठरणार, हे समाजधुरिणांच्या ध्यानात आलं होतंच. भांडवलदारवर्ग, नफ्याचा मोठा हिस्सा स्वतःकडे ठेऊन कामगार-कर्मचाऱ्यांचं अतोनात शोषण करणार आणि त्याचं समर्थन करण्यासाठी वेगवेगळी मिथकं रचणार अथवा प्रतिपादनं करणार (उदा. भांडवलदार खूप कष्ट घेतात, धोके पत्करतात, नव्याचा शोध घेतात, नफ्यातून गुंतवणूक करुन राष्ट्रीय-समृद्धीत भर घालत रहातात व रोजगारनिर्मिती करतात; तसेच, 'भांडवली-व्यवस्था' ही इतर कुठल्याही व्यवस्थेपेक्षा अधिक सक्षम व उत्पादक असते म्हणून, भांडवलशाहीत सम ाजात निर्माण होणारी 'आर्थिक-विषमता' ही योग्यच होय वगैरे वगैरे), हे ही सगळ्यांच्या ध्यानात आलं होतं. त्यामुळे, भांडवलदारवर्गाने नफा कमावणं आणि केवळ कमावणंच नव्हे; तर, कितीही आणि कसाही कमावणे...या अनैतिक व समाजघातकी विचारसरणीला, अशातऱ्हेनं 'नैतिक-अधिष्ठान' देण्याचा (जसा तो विशेषत्वाने, १९७०-८०च्या दशकात 'रिगन-थॅचर'कृत 'नवउदारमतवादी-विचारसरणी पसरवताना केला गेला) निरंतर केविलवाणा प्रयत्न भांडवलदार करत राहिले... त्याविरोधात, ठामपणे उभा रहात कार्ल मार्क्सने ''भांडवलशाहीत कामगारांच्या असहाय्य स्थितीचा व त्यांच्या स्खलनशीलतेचा गैरफायदा घेऊन त्यांचं अमानुष शोषण केलं जातं आणि ती पुढे जाऊन स्वतःतल्या अंतर्विरोधातूनच कोसळून पडेल'', असं भांडवली-कालचक्राला आव्हान देणारं सप्रमाण प्रतिपादन केलं.

**'रिगन-थॅचर'प्रणित तथाकथित 'उदारमतवादी-विचारसरणी' (Neo-Liberalism) आणि अमानुषतेचा व आर्थिक-विषमतेचा कहर....**

अमेरिकन अध्यक्ष जेम्स मोन्रो यांनी वर्ष-१८२३मध्ये अंगिकारलेल्या नृशंस परदेशनीतिनुसार, ज्याला 'मोन्रो-तत्त्वप्रणाली' (Monroe Doctrine) म्हटलं जातं, अमेरिकेची भौगोलिक हद्द जशी थेट पॅसिफिक महासागरापर्यंत विस्तारली...तसाच, या १९७०नंतरच्या नवउदारमतवादी (Neo-Liberal) कालखंडात अमेरिकन कंपन्या जगभर आपले हातपाय पसरु लागल्या...त्यांच्या नवउदारमतवादी 'बंधमुक्त' उद्योग-व्यवसायासाठी जणू जग हे एक 'जागतिक-खेडं'च (Global-Village) बनलं, असंच नव्हे; तर, कॉर्पोरेटीय-वर्चस्ववादी नृशंस खेळ खेळण्यासाठी एक आंगण (Corporate-Courtyard) बनलं... आणि, 'मोन्रो-तत्त्वप्रणाली'नुसार भौगोलिक-विस्तार करताना, स्थानिक-जमातींची सामूहिक हत्याकांड वा नरसंहार घडवण्यासारखं जे भयंकर क्रौर्य दाखवण्यात आलं; तोच गर्हणीय प्रकार, नवउदारमतवादी-विचारसरणीअंतर्गत 'खाउजा' धोरण (खाजगीकरण-उदारीकरण-जागतिकीकरण) जगभरातल्या कामगारविश्वात राबवताना कॉर्पोरेटीय-जगतानं अवलंबला...फक्त, या कॉर्पोरेटीय-प्रयोगात थेट जनतेच्या नजरेसमोर जरी रक्ताचे पाट वाहिले नाहीत; तरी, चिलीसारख्या अनेक देशांतील लोकनियुक्त राष्ट्रप्रमुखांच्या CI कडून लष्करी-कटकारस्थानं करुन हत्या केल्या गेल्या, जाज्वल्य कामगार-नेत्यांचे व डाव्या विचारसरणीच्या लोकांचे सर्रास मुडदे पाडले गेले आणि श्रमिकवर्गाच्या रक्ताचा घाम आणि साध्या पाण्याचा दाम...यातला फरक 'स्वस्त-मजुरी'ने पुसून टाकला!

याच संदर्भात, ''When the rich rob the poor, it's called business. When the poor fight back, it's called violence,'' हे मार्क ट्वेनचे प्रत्ययकारी उद्गार समजून घेणं आवश्यकच.

''माणसाने उभारलेल्या व्यवस्था किती ठिसूळ, तकलादू असू शकतात; हे आपल्याला करोना-काळाने दाखवल्यानंतर एक गोष्ट निश्चित झालीय की, बाजारपेठीय-व्यवस्थेला अनिर्बंध स्वातंत्र्य बहाल करुन सगळ्या मानवी-समस्या सुटणार नाहीत. अर्थव्यवस्थेच्या इशाऱ्याला भीक न घालणारी, एक 'राजकीय-प्रणाली' उभी करणंच केवळ नव्हे; तर, मानवी जगण्यातला सन्मान-सुरक्षा पुन्हा एकवार मध्यवर्ती स्थानी प्रस्थापित करुन, त्या आधारस्तंभावरच आपल्याला हवी असलेली नवी पर्यायी सामाजिक-व्यवस्था निर्माण करावी लागेल'', हे तेव्हाचं पोप फ्रान्सिस यांचं प्रतिपादन, यासंदर्भात बरंच काही सांगून जातं.

अनेक देशांच्या राष्ट्रीय-ढोबळ उत्पन्नापेक्षा मोठी वार्षिक-उलाढाल असणाऱ्या महाकाय बहुराष्ट्रीय कंपन्या व त्यांच्या राक्षसी-सैतानी कॉर्पोरेटीय-ताकदीचा प्रतिकार....

बाजारपेठीय प्रचंड शक्तिशाली भांडवली-व्यवस्थेविरोधातील प्रतिकार आणि त्या प्रतिकाराचं यश, तेव्हाच सुनिश्चित होऊ शकतं; जेव्हा, तळागाळातील पिडीत-शोषित समाजातील प्रत्येक व्यक्ति 'जाणकार' होऊ लागते, जागी होऊ लागते... ज्याला, कार्ल मार्क्स 'वर्ग-जाणीव' (Class-Consciousness) निर्माण होणं म्हणतो आणि कामगारांना अनेक प्रसंगी होणाऱ्या आपल्याच 'वर्गहिता'विरोधातील चुकीच्या अथवा विपरीत वर्गजाणिवेविषयीही (False Consciousness) मार्क्स आपल्याला सावध करतो.

भारतात फक्त १५ अब्जाधीश (प्रत्यक्षात खरंतरं, पाचसहाच) आणि त्यांच्या इशाऱ्यावर काम करणारी १५ च्या आसपास 'बडी राजघराणी' राज्य करतात, असं ''छे Trade Is Free'' चा लेखक व अमेरिकन अध्यक्षीय सल्लागार रॉबर्ट लाईटहायझर म्हणतो. ''भारत हा देश, १५ अब्जाधीशांकडून चालवला जातो आणि भारतीय प्रशासनिक...पृष्ठ क्र. ११ वर

# कार्ल मार्क्स ते टेक्नो-फ्यूडलिझम....

...पृष्ठ क्र. १० वरुन

व्यवस्थापनातील अधिकारीवर्ग, हा आपल्या कामाशी बव्हंशी प्रामाणिक नसतो''... ही अशातऱ्हेनं ''अलिबाबा आणि चाळीस चोर'' ऐवजी, ''१२५ कोटी प्रजा आणि १५ चोरांचं राज्य'' अशी नवी सुरस कथा रचावी लागेल...म्हणजेच, १४० कोटींच्या देशात फक्त, १५ कोटींचा मध्यमवर्ग (म्हणजेच, पिरॅमिडच्या तळातील करोडो-करोडो अश्राप जीव, आर्थिक-सुधारणांच्या समृद्धी-गंगेत उतरण्यापासूनच काय तर, तिच्या जलाचं आचमन करण्यापासून 'वंचित' राहिलेले व विकासाच्या परिघाबाहेर तिष्ठत ठेवले गेल्याने रडत-खुरडत आपलं कष्टमय जीवन कंठत राहिलेले)...असा एक १५ कोटींचा मध्यमवर्ग जो, संधि मिळताच परदेशात पळून जाण्याच्या तयारीत आहे व त्यातला, उच्चशिक्षित-उच्चमध्यमवर्ग लाखोच्या संख्येनं भारतीय-नागरिकत्व सोडून दरवर्षी विदेशात स्थलांतरित होतोच आहे... तो भारत देश १५ जणं मिळून चालवतात आणि १२५ कोटी लोकं दर ५ वर्षांनी मतदान करतात, अशी एकूण परिस्थिती आहे.

अमेरिकादेखील अशीच ५० अब्जाधीशांकडून (रक्तपिपासू-निर्मम-शोषक अब्जाधीश...Blood-Billioners OR Trillioners) चालवली जातेय... अमेरिका आणि चीन, यांच्या मध्यरेषेवर भारत उभा आहे...चीनने आर्थिक-सुधारणांनंऔर देशातील ८० कोटी लोकं 'दारिद्र्य-रेषे'बाहेर काढले; तर, चीनच्या लोकसंख्येशी बरोबरी करणारा भारत तेवढ्याच ८० कोटी लोकांना फुकट अन्नधान्य वाटतोय...कारण, ते 'दारिद्र्य-रेषे'च्या आसपास रेंगाळतायत. अमेरिकन अब्जाधीश निदान देशात मूलभूत अथवा पायाभूत-सेवासुविधा तरी, सगळ्या नागरिकांना उपलब्ध करुन देण्यात काही योगदान देतात; पण, इथे भारतात 'ग्राहक व स्वस्त मजूर' म्हणून आवश्यकता संपलेली तळागाळातील जनता, लवकरात लवकर कशी नष्ट होईल, याकडेच नव-उदारमतवादाच्या अनुकरणापश्चात भांडवली-व्यवस्थेकडून लक्ष पुरवलं जातंय.

''Unfettered Inheritance, is the Root of the Rot'' या वस्तुस्थितीकडे लक्ष वेधताना भांडवलशाहीचा उद्गाता डम स्मिथ म्हणाला होता की, ''अनियंत्रित व निर्बंधमुक्त 'वारसाहक्क' परंपरेमुळे निर्माण होणारं संपत्तीच्या व संधिंच्या केंद्रीकरणा'चं विष, 'स्वायत्त अथवा निर्बंधमुक्त बाजारपेठीय-व्यवस्था' (Free market economy) पचविण्यास असमर्थ असते''... आज तेच डम स्मिथसारख्यांचे बोल, नवउदारमतवादाच्या कालखंडामुळे जगभरातील अर्थव्यवहारात 'विषवल्ली'सारखे सर्वत्र उगवलेत. भारतात तर, याबाबत निव्वळ कहरच माजलाय...केवळ कुणी अंबानी-अदानीच्या पोटी जन्माला आला म्हणून, जन्मता क्षणीच 'लाखो कोटींचा धनी' होऊन जातो!

तळागाळातील लोकांच्या हितासाठी, श्रमिकवर्गाच्या कल्याणासाठी जग कायमचं बदलून टाकणाऱ्या कार्ल मार्क्सचा अंत्यविधी....

कार्ल मार्क्सचा प्रभाव रशिया-चीन-व्हिएतनामसारख्या अनेक साम्यवादी (कम्युनिस्ट) देशांच्या भौगोलिक सीमा लंघून केव्हाचाच जगभर चौफेर उधळला होता व त्या अमित विद्युतचुंबकीय प्रभावाखाली...मी मी म्हणणाऱ्या अमेरिका, इंग्लंड, सिंगापूर, युरोपियन व स्कँडेनेव्हियन-नॉर्डिक प्रगत भांडवली-देशांना; तसेच,भारतासारख्या अनेक छोट्यामोठ्या विकसनशील देशांना...'संमिश्र-अर्थव्यवस्थे'चा स्विकार अपरिहार्यपणे करावा लागला... जगभर जनहिताची 'कल्याणकारी-राज्य संकल्पना' (Welfare-State)... सगळ्याच राज्यव्यवस्थांचा 'मूलाधार' बनली (आणि, ज्याच्या गळ्याला सध्याच्या भाजप-संघीय 'Crony Capitalist' रासवट राजवटीमुळे, नख लावलं जातंय), ती केवळ एका कार्ल मार्क्ससारख्या लोकोत्तर अवलियामुळेच!

संजय आवटेंच्या लेखामधील व्हिएतनामची एक अठरा-वीस वर्षांची पोरगी त्यांच्याकडे रागाने बघत उद्गारते, ''तुम्हाला कार्ल मार्क्स माहिती नाही? आज आपण जे काही आहोत, ते केवळ त्यांच्यामुळेच...तुम्हाला दर महिन्याला पगार मिळतो ना, सुट्टी मिळते ना, आजारपणाची रजा मिळते ना, आरोग्यासाठी सुविधा मिळतात ना... हे सगळं त्या कार्ल मार्क्समुळेच...आपण त्यांच्या अनेक गोष्टी ऐकल्या नाहीत; त्या ऐकल्या असत्या तर, यापेक्षाही आपलं जग सुंदर झालं असतं'', असं उद्गारते, त्याचा तोच अन्वयार्थ!

इंग्लंडमधील हायगेट-दफनभूमीत उपस्थित केवळ ११ शोकाकूल लोकांसमोर भाषण करताना कार्ल मार्क्सचा जिवलग दोस्त व जीवनसाथी फ्रेडरिक एंगल्स, त्यांना आश्वस्त करत एवढंच म्हणाला की, ''त्याचं नाव कळीकाळालाही पुरुन उरेल व लोकांच्या कायमचं स्मरणात राहील!''

...हायगेट-दफनभूमीतील कार्ल मार्क्सच्या अर्धपुतळ्याखालील दगडाच्या वरच्या भागात कोरलेलं होतं, "Workers of all lands unite" आणि खालच्या भागात ""The philosophers have only interpreted the world in various ways, the point however is to change it"

*...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*

...पृष्ठ क्र. ४ वरुन

हे दुबळे व नपुंसक कामगार-कायदे, सदासर्वदा बोचत असतात आणि म्हणूनच, या भाजप-संघीय भांडवलधार्जिण्या सरकारने गलितगात्र झालेली उरलीसुरली कामगार-चळवळ संपवायला घेतलीय! कुठलंही भाजप-संघीय सरकार, हे कामगारांचा नंबर एकचा शत्रू असतं; पण, त्यांच्याकरवी जातीधर्मभेदात जाणिवपूर्वक अडकवल्या गेलेल्या महामूर्ख कामगारांना ते आकळत नाही.

तेव्हा, कामगारांच्या हिताच्या व त्यांना न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीने, निष्क्रिय व षंढ असलेलं 'कामगारखातं' एकदाचं बंदच करुन टाका व शासनाचे पैसे तरी वाचवा नाहीतरी, आता या मोदी-सरकारने आणलेल्या 'काळ्या काम गार-संहिते'च्या (Black Labour-Code) अंमलबजावणीतून त्यांना तोंडदेखलं देखील काम शिल्लक रहाणार नाहीये...कारण, युनियन्सच संपल्यानंतर, 'ना रहेगा बाँस न बजेगी बाँसुरी' अशी दारुण अवस्था होणार किंवा माझ्या हातात द्या कामगारांनो, हे 'कामगार-मंत्रालय'...मग बघाच, आजवर कामगारांचं वाटोळं केलेल्यांना चारसहा महिन्यातच, नाकात वेसण घालून कसं वठणीवर आणतो ते!

...पुढचा मुद्दा हा की, या फुंडकर-घराण्याच्या 'आकाश'रावांना कुणीतरी 'अस्मान' दाखवत सांगणं गरजेचं आहे की, तुम्ही भाजपाई लोकं सत्तेत आल्यावर देशांतर्गत बेकारी-बेरोजगारी प्रचंड वाढलीय... ती बेरोजगारी आटोक्यात आणायचं सोडून, बेकारी वाढवणारा 'ओव्हरटाईम' तुम्ही सर्रास देऊ पहाताय? ते फार तरुण आहेत, तब्येतीनं छान गलेलठ्ठ आहेत (पूर्वीच्या कामगारमंत्री प्रकाश मेहतांसारखे... इथे कामगारांशी खेळला गेलेला क्रूर विनोद हा की, गुजराथी माणूस 'भांडवलदार', हे काही विशेष नवल नाही; पण, एखादा धनदांडगा प्रकाश मेहतांसारखा गुजराथी माणूस महाराष्ट्रात 'कामगारमंत्री' देखील बनू शकतो)...आकाशराव, हे खात्यापित्या घरचे आहेत, असू द्यात...त्यात आम्हाला आनंद आहे; पण, आकाशजी, अहो सध्या कंत्राटी-कामगार पद्धतीच्या आक्रमणाने सगळीकडे पगार एवढे रोडावलेत-खंगलेत (म्हणूनच, कामगारांच्या तब्येती, तुम्हा लोकांसारख्या 'वजनदार' नसतात) की, त्या तुटपुंज्या पगारात रोजच्या चारच काय, आठ तासांच्या 'ओव्हरटाईम'ची भर घातली...तरी, महिन्याअखेर जी कामाची बिदागी हातात पडते; त्याने महागड्या शहरांमधला संसाराचा गाडा हाकता येणं कर्मकठीणच! म्हणजे, तुमच्या भांडवली-व्यवस्थेनं अत्यंत कुटीलतेने पगार एवढे कमी ठेवलेत की, कामगार सगळीकडे सक्तीने म्हणा किंवा नाईलाजास्तव म्हणा, मरमर ओव्हरटाईम करतोच आहे, करत रहाणारच आहे...त्यासाठी, तुमची कामगारहिताची ढोंगी मल्लीनाथी नकोच! थोडक्यात, साधी गोष्ट ही की, तुम्ही लोकांनी दिवसाचे कामाचे तास आपसूकच बारा तास होण्याची तरतूद केलेली आहे...तुम्ही लोकं एवढे निर्ढावलेले व संवेदनशून्य-नृशंस आहात की, ते उद्या दिडशे-दोनशे वर्षांपूर्वी होते, तसे १६-१६ तासांचे पण खुबीने कराल! तुम्ही 'करियर'च्या व 'महिलासबलीकरणा'च्या वगैरे भूलथापा देत सर्रास शिक्षित महिलावर्गाला घरच्या उंबरठ्याबाहेर ओढून उद्योग-सेवा क्षेत्रात आणलंत (कारण, नोकरी करण्याची मनस्वी इच्छा नसली; तरीही नवऱ्याच्या पगारात हंहार फुलवता येत नाही, मुख्य म्हणजे अतिरेकी महागडे फ्लॅट घेता येत नाहीत; म्हणूनच, अनेकजणींना नोकरीची भयंकर थकवणारी रोजची उलघाल करावी लागते...'घर आणि कॉर्पोरेट', अशा दोन्ही आघाड्यांवर जीवघेणी लढत द्यावी लागते) आणि आतातर, तळागाळातल्या अशिक्षित महिलावर्गाच्या हातात 'रिक्षाचं हँडल'च तुम्ही लोकांनी दिलंयत...उन्हातान्हात, पावसापाण्यात आमच्या भगिनींना 'कंत्राटी-गुलाम' असलेल्या त्यांच्या नवऱ्यांच्या तुटपुंज्या पगारात एकीकडे भागत नाही आणि दुसरीकडे त्याही फडतूस नोकरीची बिलकूल शाश्वती नाही; म्हणून, हे सव्यापसव्य करावं लागतंय...आणि, दिवसेंदिवस अधिकाधिक महाग होत जाणाऱ्या शहरांमधून अगदीच जमेनासं झालं की, सहकुटुंब आत्महत्या करावी लागतेय.

...तेव्हा, तुमच्याकडून 'शेंड्या' लावून घेण्याएवढे आम्ही अगदीच 'पेंदे' नाही आहोत...उद्या जर कधी हा मराठी-कामगार जागा झाला ना, तुम्हा भाजप-संघीय लबाड (पक्के आतल्या गाठीचे) व लुटेर्या लोकांची कशी पळापळ होईल, ती बघाच... धन्यवाद!

*...राजन राजे*
(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

उर्वरीत भाग पुढिल अंकात

# नास्तिक दर्शनांचे आगळेपण

एकूण नऊ दर्शने प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानातील विविध वैचारिक शाखांचे प्रतिनिधित्व करतात. त्यामध्ये वास्तविकता, ज्ञान, धर्म, नैतिकता आणि मुक्ती या विषयांवर विविध दृष्टिकोनांनी विस्तृतपणे विवेचन केलेले दिसते. या महर्षींना प्रत्येक दर्शनाचे सूत्रकर्ते म्हणतात. कारण त्यांनी त्या त्या दर्शनिक तत्त्वज्ञानाचे मूलभूत सिद्धांत सूत्रबद्ध केले. याचा अर्थ, या दर्शनांमधील विचार या ऋषींच्या आधीही अनेक वर्षे अस्तित्वात होतेच. त्या विचारांना संकलित करून एकत्रितपणे सूत्रबद्ध करून त्या ऋषींनी त्यांची मांडणी केली म्हणून, त्यांना त्या त्या दर्शनाचे सूत्रकर्ते संबोधले जाते. ही दर्शने भारतीय तत्त्वज्ञानाचा मूलभूत पाया आहेत...

**'नास्तिक' हा शब्द ऐकला, की अनेकांच्या मनात लगेच धर्मविरोधी किंवा ईश्वर नाकारणारी व्यक्ती अशी प्रतिमा उभी राहते. पण हा खूप वरवरचा अर्थ झाला. कारण भारतीय आणि पाश्चात्य विचारसरणीत नास्तिकतेचा अर्थ आणि त्याचे उपायोजन फार वेगळे आहे. भारतीय नास्तिकता ही तत्त्वचिंतनात्मक आणि आध्यात्मिक प्रश्नांची चिकित्सा करणारी आहे, तर पाश्चात्य नास्तिकता ही मुख्यत्वे ईश्वराच्या अस्तित्वाचा निषेध करणारी भूमिका घेते. म्हणून नास्तिक या एकाच शब्दाच्या पौर्वात्य आणि पाश्चात्य तत्त्वज्ञानात अर्थच्छटा भिन्न आहेत. भारतीय तत्त्वज्ञानात पारंपरिक अर्थाने नास्तिक म्हणजे, जो वेदांना प्रमाण मानत नाही तो... त्यामुळे बौद्ध, जैन, चार्वाक ही नास्तिक दर्शने मानली जातात. कारण त्यांनी वेदांचे प्रामाण्य नाकारले. पण या नास्तिक संप्रदायांनी धर्म, नैतिकता, मोक्ष, आत्मा, आणि कर्म यांसारख्या संकल्पनांवर मंथन केलेले आहे. म्हणजेच, ते धार्मिक नसले तरी तात्त्विक आहेत.**

## तत्त्वज्ञानप्रवृत्त आत्मशोधात्मक प्रणाली

पाश्चात्य नास्तिकता मात्र मुख्यतः ईश्वराच्या अस्तित्वाच्या निषेधावर आधारलेली असते. म्हणजेच, 'God Doesn't Exist' ही त्यांची मुख्य भूमिका असते. त्यामुळे तिथे नास्तिकता ही बहुधा धर्मविरोधी आणि कधीकधी अध्यात्म विरोधी सुद्धा असते. पाश्चात्य नास्तिकतेचा आधार विज्ञान, तर्क आणि स्वातंत्र्य हाच असतो.

चार्वाक संप्रदाय प्रत्यक्ष ज्ञान (इंद्रियज्ञान) हाच एकमेव खरा ज्ञानाचा स्रोत मानतो. 'जे दिसतं, तेच खरं' ही त्यांची मूलभूत भूमिका असते. त्यामुळे त्यांनी आत्मा, पुनर्जन्म, स्वर्ग-नरक, मोक्ष, हे सगळं फेटाळलं. तसेच वेद, यज्ञ, कर्मकांड ही भोंदूगिरी आहे म्हणून नाकारले.

भारतात ऐतिहासिक दृष्टिकोनाने नास्तिक विचारांना विरोध झालेला असला तरी, त्यांना तत्त्वचिंतनाचे स्थान मिळाले आहे. पाश्चात्य देशांमध्ये मात्र नास्तिकतेकडे अनेकदा धर्मविरोधी बंडखोरीसारखे बघितले जाते, आणि अजूनही काही पाश्चात्य समाजात नास्तिकांकडे संशयाने पाहिले जाते. गेल्या दहा वर्षात हिंदुत्ववादी सरकार आल्यानंतर भारतातही हीच परिस्थिती उद्भवलेली आहे, एक हे खेदाने नमूद करणे भाग आहे. एकूणच सध्याची परिस्थिती ही विचारकलहाला घाबरणारी आणि वैचारिक प्रश्नांना बगल देणारी निर्माण झालेली आहे.

भारतीय नास्तिकता म्हणजे एक तत्त्वज्ञानप्रवृत्त, आत्मशोध करणारी, सामाजिक आणि वैचारिक प्रणाली आहे. पाश्चात्य नास्तिकता मात्र धर्मविरोध आणि ईश्वरनिषेधाच्या चौकटीत अधिक वेळा अडकलेली असते. त्यामुळे 'नास्तिक' या शब्दाचा अर्थ समजून घेताना त्याच्या सांस्कृतिक संदर्भाची जाणीव असणे आवश्यक आहे.

## आहे आस्तिक तरीही...

भारतातही वेगवेगळ्या विचारांचे प्रवाह वेदकालापासून चालत आलेले आहेत. ते आस्तिक नास्तिक या स्वरूपाचे आहेत. काही विचारप्रवाह धड आस्तिकही नाहीत आणि पूर्ण नास्तिकही नाहीत, असा मध्यम मार्ग स्वीकारणारे आहेत. तरीही या प्रवाहांनी काही प्रमाणात नास्तिकतेची मांडणी केली असल्यामुळे त्यांना नास्तिक दर्शने असे म्हटले जाते.

सांख्यदर्शन हे एक असे दर्शन आहे, जे आत्मा, पूर्वजन्म आणि पुनर्जन्म या संकल्पनांना वेगळ्या प्रकारे मानते. सांख्यदर्शनात, पुरुष (आत्मा) आणि प्रकृती (निसर्ग) या दोन मूलभूत तत्वांचे अस्तित्व मानले जाते. पुरुष हे ज्ञानाचे स्वरूप आहे, तर प्रकृती ही विश्वाची उत्पत्ती आणि विकासाचे कारण आहे. सांख्य दर्शनात आत्मा हा प्रकृतीच्या प्रभावाखाली येत नाही. ते वेदांच्या अधिकारित्वाला मान्यता देते आणि ईश्वराचे अस्तित्व मान्य करते. म्हणून सांख्यदर्शन आस्तिक आहे. परंतु त्याची ईश्वराची संकल्पना वेगळी आहे. सांख्यदर्शनात ईश्वर हा निर्गुण आणि निराकार मानला जातो. अशाप्रकारे सांख्यदर्शनाचे तत्त्वज्ञान इतर आस्तिक दर्शनांपेक्षा वेगळे आहे.

## आत्म्याचे आकलन

जैन आणि बौद्ध दर्शने पुनर्जन्म आणि मोक्ष मानतात, परंतु ती नास्तिक दर्शने मानली जातात, कारण ती वेदांच्या अधिकारित्वाला मान्यता देत नाहीत. जैन आणि बौद्ध दर्शने वेदांच्या अपौरुषेयत्वाला (दैवी उत्पत्ती) मान्यता देत नाहीत. त्याऐवजी त्यांनी त्यांचे एक वेगळे स्वतंत्र तत्त्वज्ञान तयार केलेले आहे. जैन आणि बौद्ध दर्शने पुनर्जन्म आणि मोक्ष मानतात, परंतु त्यांच्या स्वतंत्र तत्त्वज्ञानातून.

**बौद्ध दर्शनाच्या तत्त्वज्ञानात आत्म्याला कुठेही जागा नाही. त्यामुळे आत्मा अमर आहे, ही त्यांच्या लेखी खुळी समजूत आहे. त्यांचा पुनर्जन्म हा चैतन्याच्या प्रवाहाच्या स्वरूपात असतो आणि मोक्षाला त्यांनी निर्वाण म्हणजेच मुक्ती म्हटले आहे. बौद्धांनुसार पुनर्जन्म हा आत्म्याचा पुनर्जन्म नाही, तर शरीर आणि मनाच्या संयोगाचा पुनर्जन्म आहे.**

## चार्वाक विचारसरणीचे महत्त्व

चार्वकांची विचारसरणी भारतीयांनी उचलून धरली असती तर, विज्ञान क्षेत्रात भारताने एकेकाळी जी भरारी मारली होती, त्यापेक्षा आज भारत जगात कितीतरी पुढे असता. दहाव्या शतकापूर्वी आयुर्वेद, रसायन, वैद्यक, शिल्प इत्यादी विषयांवर इथे अभ्यासपूर्ण ग्रंथरचना झाली होती. भूमिती, व्याकरण, कला यांचाही समावेश त्यात होता. पण कालपरत्वे समाज अलौकिकत्वाच्या ओढीने योगधारणा, भक्तीमार्ग, मोक्षसाधना, परलोक, मृत्यूनंतर जीवन यामागे लागला. त्यातून भारतीयांचा निराशावादी दृष्टिकोन वाढीस लागला. तसे विज्ञान आणि चिकित्सक विचार मागे पडत गेले. अधोगतीला सुरूवात झाली. हे जर बदलायचे असेल तर सातत्याने समाजाचे वैज्ञानिक दृष्टिकोनातून प्रबोधन करण्याची गरज आहे, प्रश्न विचारण्याचे धाडस समाजामध्ये निर्माण करण्याची गरज आहे. चार्वाकांच्या विचारसरणीचा पुन्हा एकदा साकल्याने विचार करण्याचीदेखील गरज आहे...

**बौद्ध दर्शनात पुनर्जन्माचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे :**

१. बौद्धांनुसार आत्मा हा एक अविनाशी आणि अनंत असा वास्तविक तत्त्व नाही. त्याऐवजी, शरीर आणि मन हे क्षणिक आणि बदलणारे आहेत.

२. बौद्धांनुसार पुनर्जन्म हा कारण आणि परिणाम (कर्म) यांच्या आधारे ठरवला जातो. प्रत्येक कृतीचे परिणाम त्याच्या भविष्यातील जन्मांवर परिणाम करतात.

३. बौद्धांनुसार पुनर्जन्म हा विज्ञानाच्या आधारे ठरवला जातो, ज्यामध्ये मनाची अवस्था आणि कर्माचे परिणाम यांचा समावेश होतो.

४. बौद्धांनुसार पुनर्जन्म हा संस्कारांच्या आधारे ठरवला जातो. बौद्ध पुनर्जन्माचे उद्दिष्ट म्हणजे, निर्वाण प्राप्त करून दुःखाच्या चक्रातून मुक्ती करून घेणे होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या 'बुद्ध आणि त्याचा धम्म' या पुस्तकामध्ये निर्वाण या शब्दाचा अर्थ सदाचारी म्हणजेच निर्दोष जगणे असा घेतलेला आहे. त्यामुळे जिवंतपणीच माणूस निर्वाणपदाला पोहोचू शकतो, असे त्यांचे म्हणणे आहे.

**बुद्ध दर्शनात मात्र मोक्षाचा अर्थ खालीलप्रमाणे आहे. मोक्ष म्हणजे :**

१. बुद्धांनुसार मोक्ष म्हणजे, दुःखाच्या चक्रातून मुक्ती करून घेणे, ज्यामध्ये जन्म, मृत्यू, आणि पुनर्जन्म यांचा समावेश होतो.

२. मोक्ष म्हणजे, निर्वाण प्राप्त करणे म्हणजे, दुःखाच्या मूळ कारणांचा नाश करणे होय.

३. मोक्ष म्हणजे, तृष्णा (वासना) मुक्ती करून घेणे, ज्यामुळे व्यक्ती दुःखाच्या चक्रातून बाहेर पडते.

४. मोक्ष म्हणजे, शांती आणि समाधानाची स्थिती प्राप्त करून, ज्यामध्ये व्यक्ती स्थिर आणि शांत राहते.

बुद्धांच्या मोक्षाचा मार्ग हा अष्टांग मार्ग (आठ सूत्रे) आहे, ज्यामध्ये योग्य दृष्टिकोन, योग्य संकल्पना, योग्य वचन, योग्य कृती, योग्य जीवन, योग्य प्रयत्न, योग्य स्मृती, आणि योग्य समाधान यांचा समावेश होतो. हा अष्टांग मार्गच डॉ. आंबेडकरांनी त्यांच्या निर्वाणासंबंधित विचारांत घेतलेला आहे.

जैन धर्मात आत्म्याची संकल्पना मानली जाते. जैनांनुसार आत्मा हा एक अविनाशी आणि अनंत असे एक वास्तविक तत्त्व आहे, जे शरीरात बास करते. म्हणून जैन दर्शनात आत्म्याला 'जीव' असे म्हटले जाते. जीव हे एक स्वतंत्र असे तत्त्व असून ते शरीरापासून वेगळे आहे. जीवाचे अस्तित्व शरीराच्या जन्मापूर्वी आणि शरीराच्या मृत्यूनंतरही असते.

**जैनांनुसार जीवाचे मुख्य गुणधर्म खालीलप्रमाणे आहेत :**

१. जीव हा चेतन असतो आणि त्याला अनुभव आणि ज्ञान असते.

२. जीव हा अविनाशी असतो म्हणून त्याचा नाश होत नाही.

३. जीव हा अनंत असतो आणि त्याचे अस्तित्व विश्वाच्या सर्व भागात आहे.

४. जीव हा स्वतंत्र असतो आणि त्याचे अस्तित्व शरीरापासून वेगळे आहे.

...पृष्ठ क्र. १३ वर

...पृष्ठ क्र. १२ वरुन

जैन धर्मात आत्म्याच्या संकल्पनेचा महत्त्वाचा भाग म्हणजे त्याचा कर्माशी असलेला संबंध. जीवाचे कर्म हे त्याच्या कृतींचे परिणाम आहेत जे त्याच्या भविष्यातील जन्मांवर परिणाम करतात. जैनांनुसार आत्म्याची मुक्ती कर्मांच्या बंधनातून मुक्त होऊन आणि मोक्ष प्राप्त करून शक्य आहे. त्यालाच ते कैवल्यानंद असे म्हणतात.

## तर्काधिष्ठित दर्शन

या सर्व नास्तिक दर्शनाहून वेगळे आहे, ते चार्वाक दर्शन. ते इहवादी दर्शन असून तर्काधिष्ठित आहे. म्हणून चार्वाकांना विज्ञानवादी दृष्टिकोनाचे प्रवर्तक म्हणतात. या दर्शनाचे सगळेच ग्रंथ वैदिकांनी जाळून टाकल्यामुळे मूळ ग्रंथ उपलब्ध नाहीत, परंतु वैदिकांनी चार्वाकांच्या विचारांचे खंडन करण्यासाठी पूर्वपक्ष म्हणून त्यांच्या दर्शनांतून केलेल्या उल्लेखांतून चार्वाक मत जाणून घेता येते.

**चार्वाकदर्शनाचे सर्वांत प्राचीन नाव लोकायत असे आहे. एका विशिष्ट शास्त्राची वाचक या अर्थाने पाणिनीने लोकायत या संज्ञेचा उल्लेख केला आहे (अष्टा. ४.२.६०). व्याकरण महाभाष्यातही लोकायत शास्त्रावर भागुरीने लिहिलेल्या टीकेचा उल्लेख केलेला आहे. कौटिल्यानेही लोकायत शास्त्राचा निर्देश केला आहे. महाभारतात कण्वाश्रमाचे जे वर्णन आले आहे, त्यात वेदवेदान्तज्ञ ब्राह्मणांबरोबरच लोकायतिक मुख्यांचाही उल्लेख झालेला आहे. यावरून पाणिनी, कौटिल्य व महाभारत यांच्या काळी लोकायत शास्त्र हे वैदिक आर्यांमध्ये प्रतिष्ठा पावलेले एक दर्शन बनले होते, हे कळून येते.**

### लोकायत या शब्दाची फोड पुढीलप्रमाणे करतात-

(१) लोक म्हणजे इहलोक व आयत म्हणजे आधारित. यावरून इहलोकावर आधारलेले मत, ते लोकायत मत होय.
(२) लोक म्हणजे सामान्य जन; त्यांना पटणारे मत.
(३) लोक म्हणजे इंद्रियविषय; त्यांना महत्त्व देणारे मत.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लोकायत हे बृहस्पतीचे नाव असावे, असे सुचविले आहे. त्यांच्या मते, लोकायत ही पित्याच्या लोक या नावावरून बृहस्पतीला मिळालेली पैतृक संज्ञा असावी. लोकायत म्हणजे लोकपुत्र. ऋग्वेदाच्या १०.७२ या सूक्ताचा द्रष्टा लौक्य बृहस्पती नामक ऋषी आहे. लौक्य म्हणजे लोकपुत्र होय. पुढे याच दर्शनाला चार्वाकदर्शन असे म्हणू लागले. चार्वाक नावाचा या दर्शनाचा एक फार मोठा आचार्य होऊन गेला. त्यामुळे त्याच्याच नावावरून हे दर्शन ओळखले जाऊ लागले.

## वैतंडिक परंपरा

चार्वाक मताचे लोक बुद्धिवादी होते. स्वमतस्थापनापेक्षा परमतखंडनाकडे त्यांचे लक्ष अधिक होते, म्हणून त्यांना वैतंडिक असेही म्हणत असत. ते वेदप्रामाण्य मानीत नसत. त्याचप्रमाणे ते जैन व बौद्ध आगमांचीही निंदा करीत. त्यामुळे ब्राह्मण, जैन आणि बौद्ध असे सर्व धर्माचार्य चार्वाकमताचे विरोधी बनले. रामायणात रामचंद्राने भरताजवळ लोकायतिकांची अनर्थकुशल, बाल व पंडितमानी अशी निंदा केली आहे. भगवान बुद्धाने भिक्षूना लोकायतशास्त्र शिकण्याची बंदी केली होती, असे विनयपिटकावरून कळते. जैन ग्रंथांत तर या दर्शनाला मिथ्या दृष्टीचा एक प्रकार असेच म्हटले आहे.

## धर्मीय नास्तिक कसे ?

**जगातले बहुतेक सगळेच धर्म आत्मा, परलोक, कर्म या मार्गाने लालुच दाखवत असतात. नास्तिक व्यक्ती ही कुठलाही पोथीनिष्ठ वा अलौकिक जगाचे स्वप्न दाखवणारा धर्म मानत नाही. अशा प्रसंगी ज्या व्यक्ती मी हिंदू नास्तिक आहे, मी बौद्ध नास्तिक आहे, मी मुस्लिम नास्तिक आहे, मी ख्रिश्चन नास्तिक आहे, असे म्हणतात ते पूर्णपणे तत्वचिंतनात्मक आणि अध्यात्मिक चिकित्सा करणारे नास्तिक नसतातच. कारण धर्म आला म्हणजे, त्या धर्माचे भलेबुरे सगळे यमनियम मान्य करावे लागतात. त्यामुळे एखाद्या व्यक्तीला एखादा धर्म जवळचा वाटू शकत असेल तर ती व्यक्ती पूर्णपणे नास्तिक नसते...**

बृहस्पतीच्या सूत्रांचा उल्लेख अनेक प्राचीन दर्शनग्रंथांत मिळतो. 'एक आत्मनः शरीरे भावात' (ब्र. सू. ३.३.५३) या सूत्रावरचे भास्करभाष्य व शांकरभाष्य, गीतेवरील नीलकंठी, श्रीधरी व मधुसूदनी या टीका आणि अद्वैतब्रह्मसिद्धी, इ. ग्रंथांत पूर्वपक्षादाखल चार्वाकदर्शनाची सूत्रे उद्धृत केली आहेत. प्राचीन काळी चार्वाकदर्शनाचे मूळ ग्रंथ उपलब्ध होते; पण पुढे ते ग्रंथ वैदिकांनी जाळल्यामुळे त्यांचा लोप झाला. निरनिराळ्या दर्शनांतही पूर्वपक्ष म्हणून चार्वाकमते मांडलेली आढळतात. याशिवाय जयराशिभट्टाचा तत्त्वोपप्लवसिंह, न्यायमंजरी, विवरणप्रमेयसंग्रह, सर्वसिद्धान्त संग्रह, सर्वमतसंग्रह, षड्दर्शनसमुच्चय व त्यांवरील गुणरत्नकृत टीका, सर्वदर्शनसंग्रह, कमलशीलकृत तत्त्वसंग्रहाची पंजिका, इ. ग्रंथांवरून या दर्शनाची आणखी काही तत्त्वे कळतात. चार्वाकवादी प्रत्यक्ष हे एकच प्रमाण मानतात. विषय आणि इंद्रिये यांच्या संयोगाने उत्पन्न होणारे ज्ञान ते प्रत्यक्ष होय. इंद्रियांनी प्रत्यक्ष होणारे जगत् हेच सत्य आहे. बाकीचे सर्व पदार्थ हे असत् होत. चक्षु, श्रोत्र, घ्राण, जिव्हा व त्वचा या इंद्रियांच्या द्वारे होणारे ज्ञान हेच प्रमाण असून, अस्पृष्ट, अनास्वादित, अनाघ्रात, अदृष्ट व अश्रुत अशा पदार्थांना अस्तित्वच नाही, अशी चार्वाकवाद्यांची मते आहेत.

### चार्वाक दर्शनाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :

१. भौतिकवाद : चार्वाक दर्शन हे भौतिकवादी तत्त्वज्ञान आहे, ज्यामध्ये भौतिक जगाच्या अस्तित्वाला मान्यता दिली जाते.
२. नास्तिकवाद : चार्वाक दर्शन हे नास्तिक तत्त्वज्ञान आहे, ज्यामध्ये वेद, ईश्वर, आत्मा, पुनर्जन्म, आणि मोक्ष या संकल्पनांना मान्यता दिली नाही.
३. इंद्रियवाद : चार्वाक दर्शनात इंद्रियांना महत्त्वाचे स्थान आहे, आणि त्यांनी इंद्रियांच्या अनुभवाला मान्यता दिली. म्हणून त्यांचा प्रत्यक्ष प्रमाणावर भर असतो.
४. वेदविरोध : चार्वाक दर्शनात वेदांच्या अधिकारित्वाला नकार दिला आहे.
५. सुखवाद : चार्वाक दर्शनात सुखाला महत्त्वाचे स्थान आहे आणि त्यांनी सुखाच्या अनुभवाला मान्यता दिली आहे.
६. ईश्वरविरोध : चार्वाक दर्शनात ईश्वराच्या अस्तित्वाला मान्यता नाही.
७. आत्मविरोध: चार्वाक दर्शनात आत्म्याच्या अस्तित्वाला मान्यता नाही.
८. पुनर्जन्मविरोध: चार्वाक दर्शनात पुनर्जन्माच्या संकल्पनेला मान्यता नाही.
९. मोक्षविरोध: चार्वाक दर्शनात मोक्षाच्या संकल्पनेला मान्यता नाही. त्यामुळे जे काही भोगायचे आहे, ते या जन्मातच असे त्यांचे तत्त्व आहे.

या विवेचनावरून आपल्या लक्षात येईल की, वरील सर्व नास्तिक दर्शनांमध्ये खऱ्या अर्थाने 'चार्वाक दर्शन' हेच एकमेव नास्तिक दर्शन आहे. जे मुख्यतः प्रारंभी उल्लेख केला त्यानुसार, तत्त्वचिंतनात्मक आणि आध्यात्मिक प्रश्नांची चिकित्सा करणारे आहे. पाश्चात्य दर्शनांपेक्षा निराळे आहे. खरं पाहता, माणूस नास्तिकतेच्या विचारांपर्यंत स्वतःशी तसेच, प्रस्थापित समाजाशी झगडून, विचार करूनच पोहोचतो. तो तारतम्याने विचार करू शकतो. नास्तिक माणूस हा स्वतःशी प्रामाणिक राहून घेतलेल्या निर्णयाचे परिणाम स्वीकारून, समाजात जबाबदारीने जगणारी व्यक्ती असतो !

***- जगदीश काबरे***

*विज्ञानप्रसार आणि सामाजिक उन्नयनाशी निगडित कार्यकर्ते, ज्येष्ठ लेखक आणि आस्वादक आहेत.*

# गरिबों की सुनो....

काही वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. ठाणे जिल्ह्यातील तलासरी तालुक्याचे पत्रकार 'लक्ष्मण कर्वे' यांचा मला फोन आला ...दापचरीच्या दुग्ध प्रकल्पातील (जि. पालघर) गरिबांची केस कोर्टात लढवायची आहे...आम्हाला एक चांगला वकील द्या. ही केस मला ठाऊक होती. कारण, झेवियर कॉलेजच्या पत्रकार विद्यार्थ्यांना घेऊन 'सीमान्त' संस्थेतर्फे मी आणि अलका गाडगीळ, त्या आदिवासी तालुक्यात फिरलो होतो; तेव्हा दापचरी दुग्ध-प्रकल्पाचे धिंडवडे, लक्ष्मण कर्वे यांनीच आम्हाला दाखवले होते.

अनेक वर्षांपूर्वी राज्य शासनाने जाहीर आवाहन करुन राज्यातील तरुण शेतकऱ्यांची मोठी महत्त्वाकांक्षी वसाहत तिथे उभारली होती. पण, येणाऱ्या निधीवर अधिकाऱ्यांनी हात मारला...'हपापाचा माल गपापा झाला'...मग हळुहळू उघडेवाघडे शेतकरी रानोमाळ भटकू लागले. कोणी केळ्याची गाडी टाकली, तर कोणी घराचे वासे विकले आणि तगून राहिला...कोणी परागंदा झाला तर, कोणी मरुन गेला. एकूणात डोंगररांगा-रानमाळ्यावर रहाणारा साधाभोळा 'अज्ञानी' आदिवासी, तथाकथित शहरी 'ज्ञानियां'कडून नागवला गेला-उध्वस्त झाला; पण, अजूनही आपल्या पिढीजात सामुदायिक जमीन-मालकीला पारखा झाला नव्हता...कुठला प्रतिकार सोडाच, साध्या अस्फुट हुंकाराविना...हे आरपार भ्रष्टतेचं नाट्य बेमालूम उरकून गेल्याची संधि साधून, अखेरीस तिथल्या एका मंत्र्याने प्रकल्पाची जागा बिल्डरच्या घशात घालायचा डाव रचला, तेव्हा मात्र, सगळे हादरले...दिशाहीन झालेल्या गरिबांनी चारही दिशांनी एकच आकान्त केला.

अशा संकटात, मुंबईचे जे वकील वंचितांच्या पाठीशी उभे राहत; त्यांच्यापैकी एक होते सुनील दिघे! मी तलासरीच्या पत्रकार लक्ष्मण कर्व्यांची, दिघे वकिलांशी गाठ घालून दिली, ...आणि, सुरु झाला एक अशक्यप्राय व मरणप्राय संघर्ष. दिघे वकिलांनी मोठ्या जिद्दीने प्रदीर्घ झुंज दिली...अखेर हो ना करता करता गरिबांची सरशी झाली, तेव्हा ते आनंदाने रडू लागले...ज्यांना हसणं फारसं कधि माहीत नव्हतं; आपला विजय कसा साजरा करावा ते त्यांना उमगेना! मग वकिलांची गावभर मिरवणूक निघाली आणि तिचं रूपांतर मोठ्या उत्साहात ग्रामसभेत झालं ... त्या गजबजलेल्या व्यासपीठावरील मानकऱ्यांच्या रांगेत शेवटची खुर्ची मला मिळाली होती.

***- सुनील कर्णिक***

# न्यूनगंडाचे अमेरिकन राजकारण...

लंडनसारख्या शहराचा महापौर सादिक खान होतो, हे तिथे अद्यापही अनेकांच्या पचनी पडलेले नाही! अशा लोकांमध्ये फक्त गोरे नाहीत. ऋषी सुनक पंतप्रधान झाले, म्हणून ज्यांनी लंडनमध्ये सत्यनारायण घातले होते, त्यांनाही सादिक खान महापौर झाल्याचा त्रास झालाच! बरं एकदा नाही, सलग तीन वेळा सादिक खान महापौर व्हावेत! लंडन आता मुस्लिमांच्या ताब्यात चालला आहे, अशी एक 'कॉन्स्पिरसी थिअरी' तिथे जोरदार चर्चेत असते. यूएईच्या कुठल्यातरी शेखने अवघे 'सेंट्रल लंडन' विकत घेतले आहे, अशी चर्चा करणारे पुणेकरही तुम्हाला लंडनमध्ये भरपूर भेटतील.

**लंडनच्या खुलेपणामुळे तिथे जाऊन गलेलठ्ठ पगाराची नोकरी मिळवायची, तिथले नागरिकत्व घ्यायचे आणि तिथे जाऊन भारतातल्या प्रतिगाम्यांना बळ द्यायचे, अशी एक मोठी जमात लंडनमध्ये आहे. ती अमेरिकेतही आहे. जात-धर्म-पंथ-भाषा असा विचार न करता सिलिकॉन व्हॅलीत यांना लायकीपेक्षा जास्त पॅकेज मिळते आणि तिथे जाऊन भारतातल्या संकुचित राजकारणाला पाठिंबा देण्यात यांची निम्मी शक्ती खर्ची पडते. अमेरिकेने 'टेरिफ' वगैरे काही लादू नये, इंग्लंडने पाच वर्षात आपल्याला नागरिकत्व द्यावे, अवघ्या जगाने खुले असावे; भारतात मात्र 'एनआरसी', 'सीएए' असे लागू व्हावे, मुस्लिमांचे कथित लांगुलचालन बंद व्हावे! या अशा ढोंगी लोकांना डोनाल्ड ट्रम्प चालतो, पण त्यांना ममदानी नको असतो. न्यूयॉर्कचा जोहरान ममदानी हा भारतीय वंशाचा. त्याची आई मीरा नायर भारतातली प्रख्यात चित्रपट दिग्दर्शक. जोहरान अत्यंत गुणी. तो न्यूयॉर्कचा महापौर होऊ शकतो. अख्खी अमेरिका त्याला उद्याचा बराक ओबामा म्हणते आहे. पण आमच्या या देशबांधवांना ममदानी नको असतो. ट्रम्प हवा असतो. लंडनमध्ये त्यांना ऋषी सुनक हवाहवासा वाटतो. तो पंतप्रधान झाल्यावर आपल्या लोकांना त्याचे केवढे कौतुक! असायला हरकत नाही, पण लंडनमधला मराठी माणूस सादिक खानचा मात्र उल्लेखही करत नाही.**

भारताच्या उदारतेचा, जगाच्या खुलेपणाचा सगळ्यात पहिल्यांदा फायदा घेणार हे; मात्र, आपल्या मनाचे दरवाजे बंदच ठेवणार! या असल्या दांभिकांमुळेच ट्रम्प अध्यक्ष होतात. ट्रम्पच्या भारतीय आवृत्तीला हे असलेच लोक परदेशातून पाठिंबा देत असतात. असे दांभिक सगळीकडेच आहेत. लंडनमधले गोरे त्याला कसे अपवाद असतील? ज्या स्थलांतरितांमुळे लंडन उभे राहिले, तेच स्थलांतरित आता लंडनमधल्या स्थानिक माणसांना नकोसे झाले आहेत. त्यांना आता आपली संस्कृती वगैरे आठवते आहे. अर्थात, अशी संस्कृती आठवणाऱ्यांमध्ये फक्त गोरेच आहेत, असे नाही. उलटपक्षी अनेक गोरे लोक स्थलांतरितांच्या बाजूने उभे आहेत. याउलट काही स्थलांतरित मात्र संकुचित आणि सोईची भूमिका घेत आहेत. ॲलन मस्क हा या अशा ढोंगी लोकांचा मेरुमणी. दक्षिण आफ्रिकेमध्ये जन्मलेला लन मस्क. महात्मा गांधींनी जिथे आपला संघर्ष खऱ्या अर्थाने सुरू केला, त्या प्रिटोरियात हा जन्मला. नंतर इंग्लंडमध्ये आला. पुन्हा अमेरिकेत गेला. अमेरिकेने त्याला मोठे उद्योजक केले. तशा संधी त्याला मिळाल्या. ज्या स्थलांतरिताला अमेरिकेने एवढे मोठे केले, तोच स्थलांतरित आता मात्र स्थलांतरितांच्याच मुळावर उठला आहे. लंडनमध्ये जो मोर्चा निघाला, त्याला मस्कबाबाचा आशीर्वाद होता.

परवा शुक्रवारी युनायटेड किंगडममध्ये मोठा मोर्चा निघाला. दीड लाख लोक त्यामध्ये होते. त्यांची घोषणा होती, 'युनाइट द किंगडम!' आपलं राज्य आपण गमावलेलं आहे. आता ते राज्य पुन्हा मिळवायचं आहे. टॉमी रॉबिन्सन नावाचा भयंकर कडवा नेता या मोर्चाचा आयोजक. हा तोच टॉमी रॉबिन्सन, ज्याने 'लंडनचा महापौर कोणीही होईल, पण खान होणार नाही', अशी प्रतिज्ञा केली होती. 'स्थलांतरितांना हाकलून द्या, सीमा बंद करा', अशी या उजव्यांची मागणी आहे. या उजव्यांमध्ये गोरे आहेतच, मात्र आता इंग्लंडचे नागरिकत्व मिळालेले अनेक काळेही आहेत. त्यात अर्थातच आपल्या देशातले अनेक आदरणीयही आहेत! एकदा आपल्याला नागरिकत्व मिळाले की मग बांगलादेशी, पाकिस्तानी वगैरे लोक यांच्या डोळ्यात खुपू लागतात. जे स्थलांतरित बेकायदेशीर आहेत किंवा गुन्हेगारी कृत्यांमध्ये अडकलेले आहेत, त्यांना देशातून बाहेर काढलेच पाहिजे. मुळात असे लोक स्थलांतरित असले काय आणि स्थानिक असले काय, त्यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे. मात्र, सगळ्याच स्थलांतरितांना या निमित्ताने विरोध करायचा, असा हा डाव आहे.

हा जो ॲलन मस्क आहे, त्याने या आंदोलकांशी व्हिडिओवर चर्चा केली. चर्चा काय, भाषणच ठोकले. आता हिंसा तुमच्या दिशेने येत आहे. करा किंवा मरा, असे घोषवाक्य त्याने ऐकवले. इंग्लंडमध्ये सरकार बदलले पाहिजे, संसद बरखास्त केली पाहिजे, असेही मस्क महोदय बरळले. ट्रम्प आणि मस्क यांचे आता जमत नसले, तरीही मूर्खपणामध्ये दोघेही तेवढेच अव्वल आहेत. 'दहशतवाद्यांना आश्रय देण्याचे काम सादिक खान करत आहेत', अशी मुक्ताफळं डोनाल्ड ट्रम्प यांनी उधळली होती. मस्क पूर्वी लंडनमध्येही होते. त्यांची टेस्ला तिथे जोरदार विकली जाते. असे अनेकजण एकत्र आलेले आहेत. त्यांना स्थलांतरित नको आहेत. त्यांना मुस्लिम अजिबात नको आहेत. तेवढ्यासाठी सीमा बंद करण्याची मागणी हे लोक करू लागले आहेत. लंडनसारखे टुमदार आणि शिस्तबद्ध, लयबद्ध शहर. पण, त्याला यांनी वेठीस धरले. निदर्शनामध्ये काही आंदोलक पोलिसांना भिडले. काही पोलीस अधिकारी जखमी झाले. लंडनच्या वाहतूक व्यवस्थेची वाट लागली. अंडरग्राउंड ट्यूबच्या चालकांनी संप पुकारल्यामुळे लंडनकरांची पुरती दमछाक झाली.

हा मोर्चा ज्यांनी काढला, ते स्वतःला देशभक्त मानतात. त्यांच्या निदर्शनांमध्ये युनियन जॅक, सेंट जॉर्ज क्रॉस आणि अमेरिकन ध्वजांचा वापर करण्यात आला. आक्रमक राष्ट्रवादाची भाषा करण्यात आली. यापैकी अनेकांनी डोनाल्ड ट्रम्प यांचा फोटो असणारे टी-शर्ट घातले होते. आता ट्रम्प हे यांचे आदर्श असतील आणि मस्कबाबा नेते असतील, तर अशा लोकांचे काय होणार आहे!

**मुद्दा तेवढाच नाही. ट्रम्प पहिल्यांदा अमेरिकेचे अध्यक्ष झाले, तेव्हा ती अमेरिकेची चूक होती. अमेरिकेने नंतर ती सुधारली. पण, आता पुन्हा ट्रम्प अध्यक्ष झाले, ती मात्र अमेरिकन माणसाने जाणीवपूर्वक केलेली कृती होती. आता आम्हाला जगाचे काही पडलेले नाही. आम्हाला नोकरी नाही. आमची आर्थिक स्थिती वाईट आहे. स्थलांतरित इथे येतात आणि आमच्या नोकऱ्या हडप करतात. आमच्या आर्थिक दुरवस्थेला जबाबदार हे स्थलांतरित आहेत. असे न्यूनगंडाचे राजकारण केले की पुढचे काम सोपे होते. कोणीतरी विरोधक हवा असतो. कोणीतरी शत्रू हवा असतो. १९६६ मध्ये आपल्याकडे जे शिवसेनेने केले, ते न्यूनगंडाचे राजकारणच होते. त्यानंतर चाळीस वर्षांनी राज ठाकरेंनी तेच केले. तेच ट्रम्प करताहेत. लंडनचा टॉमीही तेच करू पाहातोय.**

**आपले वाईट चालले आहे, तर त्याचे खापर कोणावर तरी फोडावे लागते. 'आपण विरुद्ध ते' असा संघर्ष उभा करणे राजकारण्यांच्या सोईचे असते. अमेरिकेने मुस्लिमांना शत्रू करून टाकले. जॉर्ज बुश यांच्या त्या टोळीत इंग्लंड तेव्हा सहभागी झालेले होते. आता ट्रम्प आणखी पुढे गेलेले आहेत. इंग्लंडमध्ये लेबर पक्षाचे सरकार असल्यामुळे ट्रम्प यांच्यासाठी ते गैरसोईचे आहे. जॉर्ज बुश असताना टोनी ब्लेअर ज्या पद्धतीने त्यांच्या सुरात सूर मिसळत होते, तसे कीर स्टार्मर करत नाहीत. याचा त्रास ट्रम्प यांना आहे. न्यूनगंडाचे राजकारण उभे केल्यामुळे सर्वसामान्य स्थानिक तरुणांचा पाठिंबा मिळतो. त्यांना नोकऱ्या नाहीत. त्यांची आर्थिक स्थिती बरी नाही. यासाठी भलतीकडे बोट दाखवले की, रोखच बदलतो. राजकीय नेत्यांना हे हवे असते. आपल्याकडे धर्म आणि जात यांचा उपयोग अशाच पद्धतीने केला जातो.**

टॉमी रॉबिन्सन मूर्ख असेल, मात्र मोर्चामध्ये गेलेले दीड लाख लोक मूर्ख नव्हते. त्यांचा मुख्य मुद्दा आर्थिक आहे. मुंबईमध्ये महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो माणसे जमली. त्यांचा मूळ मुद्दा आर्थिक होता. मणिपूरमधल्या संघर्षाला वांशिक चेहरा असला, तरी प्रश्न आर्थिक होता. श्रीलंकेत जे घडले, त्याचे कारण आर्थिक होते. बांगलादेशमध्ये गेल्या वर्षी जे घडले, त्याचेही कारण आर्थिक होते. आर्थिक कारणामुळेच नेपाळमध्ये उद्रेक झाला. आणि, त्यामुळेच पॅरिसच्या रस्त्यावर लोक आले. सोशल मीडियावर व्यक्त होणारी तरुणाई रस्त्यावर येते. उद्रेक करते. कदाचित तात्पुरता का असेना, सत्तापालटही करते. मात्र, लोकशाही प्रक्रियेमध्ये शांतपणे सहभागी होऊन खरेखुरे परिवर्तन घडवण्याची क्षमता त्यांच्यामध्ये नसते. त्यामुळेच आंदोलनांचाही गैरवापर केला जातो. बांगलादेशमध्ये आपल्याच राष्ट्रपित्याच्या प्रतिमा तुडवेपर्यंत मुलांची मजल गेली. श्रीलंकेत आंदोलन झाले, पण त्यामुळे पुढे काय घडले? नेपाळमध्ये जे सुरू आहे, त्याचा फायदा नक्की कोण घेणार आहे? लोकशाही प्रक्रियेत सहभागी होऊन तरुण मुलांनी परिवर्तन घडवले असते, तर तिथले चित्र आश्वासक असले असते. आता या 'जेन झेड'ने ७३ वर्षांच्या आजीबाईंना पंतप्रधान केले आहे. या आजी स्वतः ला गांधीवादी म्हणवतात. आणि, आपल्या पंतप्रधानांनाही आदरपूर्वक प्रणाम करतात!

राजकारणाच्या पलीकडे असलेल्या लोकांना सत्तेच्या पदावर बसवून खरेच काय बदल ...पृष्ठ क्र. १५ वर

**न्यूनगंडाचे अमेरिकन राजकारण...**

...पृष्ठ क्र. १४ वरुन

होणार आहे? डोनाल्ड ट्रम्प हे काही राजकारणी नव्हेत. थेट धंदेवाईक उद्योजक असणारे ट्रम्प अमेरिकेचे अध्यक्ष झाले. आपले ऋषी सुनक इंग्लंडचे पंतप्रधान झाले होते. तेही काही लोकनेते वगैरे नव्हेत. तेही उद्योजकच. नेपाळमध्ये ज्यांच्याकडे आता सूत्रे आली आहेत, त्या बाई सरन्यायाधीश होत्या. त्यांचा राजकारणाशी काही संबंध नाही. बांगलादेशमध्ये मुलांनी आंदोलन केले. आरक्षणाला विरोध केला. बेरोजगारी आणि महागाई यामुळे पेटलेल्या तरुणांनी सत्तापालट केला. तिथे आता मोहम्मद युनूस एका अर्थाने सरकारचे सर्वेसर्वा आहेत. पण त्यांचा राजकारणाशी संबंध काय आहे? श्रीलंकेमध्ये जे अराजक निर्माण झाले होते, त्यानंतर सत्तांतर झाले. 'एकेडी' या नावाने ओळखले जाणारे दिसनायके तिथे अध्यक्ष झाले. त्यांचा राजकारणाशी काही संबंध नव्हता. पंतप्रधान असणाऱ्या हरिनी अमरसूर्या या तर प्राध्यापक होत्या. त्यांचा राजकारणाशी काही संबंध नाही. ही मंडळी चांगली की वाईट, हा मुद्दा वेगळा. राजकारणाचे होत असलेले 'अराजकीयीकरण' फार चिंताजनक आहे. अशा आंदोलनांचा फायदा घेत परकीय शक्ती ज्या प्रकारे हस्तक्षेप करतात, ते तर फारच भयंकर. पाकिस्तान, श्रीलंका, बांगलादेश, नेपाळ आणि अफगाणिस्तान या सगळ्याच शेजारी देशांमध्ये गेल्या तीन वर्षांत जे सत्तांतर झाले, त्यामध्ये अमेरिका वा चीन या बलाढ्य देशांची भूमिका मोठी होती.

**असंतोष आणि आंदोलनाचा गैरफायदा घेऊन सत्तांतर कसे केले जाते, याचा अनुभव भारताने घेतला आहे. ज्यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले, ते आता कुठे आहेत? सत्तांतरानंतर जे चेहरे पुढे आले, ते कसे आहेत? असे सगळे अनुभव भारताने घेतले आहेत. २०१० ते २०१४ या कालावधीत जगभर अनेक आंदोलने झाली. अनेक ठिकाणी सत्तांतर झाले. इजिप्तपासून ते चिमुकल्या ट्युनिशियापर्यंत सत्तांतर होत असताना, भारतासारख्या महाकाय देशालाही त्याचा संसर्ग झाला. अशी 'सोशल मीडिया' आंदोलने आता पुन्हा सर्वदूर दिसू लागली आहेत. या आंदोलनांकडे असंतोष आहे. संख्याबळ आहे. स्वत:चे माध्यम आहे. मात्र, विचार नाही. पर्याय नाही. एखाद्या पोस्टवर 'डिसलाइक' वा 'गर'ची इमोजी क्षणार्धात दाबली जाते, मात्र स्वतंत्र पोस्ट लिहिण्याची प्रतिभा आणि प्रगल्भता या 'जनरेशन झेड'कडे नाही!**

**लंडनमध्ये दिसणारे आंदोलन हा त्याचाच एक भाग आहे.**

जागतिकीकरणानंतरचे भयंकर देशी पर्व सुरू झालेले आहे. 'बर्लिन ते ब्रेक्झिट' असा हा प्रवास आहे. जगाचे रूपांतर वैश्विक खेड्यामध्ये झाले आहे, असे म्हणता-म्हणता आता प्रत्येक गावाने आपापल्या वेशींना कडी-कुलूप लावण्याचे ठरवले आहे. आम्ही फक्त आमचेच बघणार, असे सगळ्यांनी ठरवले, तर सगळेच एकाकी पडणार आहेत. धर्म आणि वंश हे जगण्याचे आधार होऊ लागले, तर सगळेच निराधार होणार आहेत. प्रेम आणि समतेची, सलोखा आणि सामंजस्याची भाषा न कळणारी लोकसंख्या वाढत असताना अवघा मानवी समुदाय संकटात आला आहे. 'मेल्टिंग पॉट' अशी बहुसांस्कृतिक ओळख असणाऱ्या लंडनमधील मोर्चा ही उद्याच्या संकटाची चाहूल आहे. 'हे विश्वचि माझे घर'पासून 'माझे घरच माझे विश्व' इथपर्यंत झालेला जगाचा प्रवास उद्याच्या पिढीचे भविष्य अंधःकारमय करणार आहे!

*- संजय आवटे*

# अर्थपूर्ण एकटेपणा...

फरजाना मुस्लिम... शेजारी राहणाऱ्या हिंदू रघुवीर पासलेवर तीचं प्रेम बसलं. आंतरधर्मीय विवाह असल्यानं, दोन्ही बाजूकी अपेक्षित असा प्रचंड विरोध झाला. तरी दोघांनी काही विरोधाला जुमानलं नाही. २००१ साली फरजाना व रघुवीर पासले यांचा विवाह झाला आणि फरजानाची, प्रियांका रघुवीर पासले झाली. फरजानाने धर्म बदलला, नाव बदललं... दोन्हीकडून संबंध तोडले असले तरी, प्रियांका आणि रघुवीर यांचा संसार प्रेमाच्या आणि विश्वासाच्या भक्कम पाठिंब्यावर उभा होता. अक्षरश: एका झोपडीत उकीरड्यावर त्यांनी संसार थाटला होता. हळूहळू परिस्थिती बदलत होती. रघुवीर गॅरेज चालवत होता. यादरम्यान त्यांना दोन मुलं झाली.

**पण, २०१२ साली आक्रित घडलं... अपघातात रघुवीरचा मृत्यू झाला. प्रियांकाचं एका क्षणात होत्याचं नव्हतं झालं, ती वेडिपिशी झाली. आधीच सगळ्यांचा विरोध पत्करुन लग्न केलं होतं, त्यात हे घडलं. दिवसचे दिवस ती नुसती बसून राहत असे. अशात दिराने थोडी मदत केली. ६ महिने झाले... थोडंसं काही सुधारतंय तोच एक दिवस प्रियांकाचा मोठा मुलगा सारंग चक्कर येऊन पडला. डॉक्टरकडे नेलं तर, डॉक्टरांनी सांगितलं की, रॅबीज झालाय. तोवर रॅबीज हे नाव पण प्रियांकाने ऐकलं नव्हतं. दोन दिवसांत मोठा मुलगा रॅबीजने डोळ्यासमोर गेला. सहा महिन्यांच्या आत नवरा आणि मोठा मुलगा गेले. प्रियांका अख्खी उन्मळून पडली होती. डोक्यात आत्महत्येचे विचार येत होते. काही सुचत नव्हतं. निराशेने, उदासीने, दु:खाने प्रियांकाला पूर्ण घेरुन टाकलं होतं.**



अशात एक दिवस, अचानक एक घटना घडली. प्रियांकाचा लहान मुलगा अचानक झोपेतून किंचाळत उठला. इतके दिवस प्रियांका स्वत:च्याच दु:खात होती... इतकी की, तिला या लहान मुलाच्या अस्तित्वाचा विसरच पडला होता. तिला त्यावेळी पहिल्यांदा जाणवलं, या लहान मुलानं वडिलांचा मृत्यू बघितला आहे. रोज ज्याच्यासोबत खेळत होता, त्या भावाचाही अचानक मृत्यू झालेला बघितला आहे... त्याच्या बालमनावर काय भीषण परिणाम झाला असेल? प्रियाकांच्या आयुष्यात तो क्षण जागृतीचा होता...

मी एवढी मोठी असून जर, ही अवस्था आहे, या मुलाच्या मनावर काय परिणाम झाला असेल... हा क्षण होता. मातृत्वाच्या भावनेचा... आईच्या ताकदीचा... स्त्री शक्तीचा....

प्रियांकाने या मुलासाठी उभं राहायचं ठरवलं. महाराष्ट्र शासनाच्या उमेद अभियानात ३०० रुपये महिन्यानं नोकरी धरली. तिला शिवण येत होतं. शिवण करु लागली. उमेद अभियानात काम करता करता हळूहळू तिनं कपडयाचं दुकान टाकलं... मग झेरॉक्सचं दुकान टाकलं...

उमेद अभियानातलं तिचं काम इतकं चांगलं होतं की, लगेच पदोन्नती मिळत गेली. प्रियांकाला जवळपास ८ लाखांचे पुरस्कार या कामासाठी मिळाले. ते गुंतवून तीने २५ लाखांचं घर बांधलं.

आज प्रियांका स्त्रियांसाठी असलेल्या उमेद अभियानात क्लस्टर मॅनेजर म्हणून काम करते आहे. तिच्या अखत्यारीत १९ गावं, त्यामधील २५८ बचत गट आणि ४५०० हजारांहून जास्त स्त्रिया आहेत. या स्त्रियांना वेगवेगळ्या सरकारी योजनांची माहिती देणे, त्या योजनांचा लाभ मिळवून देणे, त्यांना शेती, शेतीपूरक उद्योग-व्यवसाय यांची माहिती देणे, कर्ज मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे... या सर्व गोष्टी प्रियांका करते.

आज प्रियांकाला क्लस्टर मॅनेजर म्हणून, १५ हजार पगार मिळतो. झेरॉक्सचं दुकान आणि कपड्याचं दुकान, असं सर्व मिळून महिना ५० हजार तिचं उत्पन्न आहे. लहान मुलगा आता २३ वर्षांचा झाला आहे.

सासरी आणि माहेरी दोन्हीकडे खूप छान संबंध झाले आहेत. सर्वजण घरी जाणं-येणं करतात. आपल्यासारख्या असंख्य स्त्रियांना उभं करायचं, हेच ध्येय प्रियांकानं ठेवलं आहे.

तिच्या व्यक्तिमत्वातल्या ठळकपणे जाणवणाऱ्या काही गोष्टी म्हणजे, चेहऱ्यावर असलेला प्रचंड शांतपणा, समाधान, प्रसन्नता आणि अफाट संयम... म्हणाली, ताई संयम ठेवला म्हणून इथवर पोहोचले!''

वयाच्या २७व्या वर्षी प्रियांका विधवा झाली होती. आज तिचं वय ४२ आहे. २७ वर्ष ते ४२ वर्ष... १५ वर्षांचा एकटेपणा आणि दु:ख. एकटेपणा किती अर्थपूर्ण करता येऊ शकतो नाही का? आणि, आयुष्य कधीही कुठुनही सावरता येऊ शकतं...

माझी आणि प्रियांकाची भेट तुळजापूरला झाली. तुळजापूर मंदिर संस्थान आणि महाराष्ट्र सरकारनं आयोजित केलेल्या सांस्कृतिक महोत्सवात प्रियांका नवदुर्गा म्हणून भेटली. मी अर्थातच करिकला गेले होते.

आयुष्याशी थेट भिडणाऱ्या एका स्त्रीचा रोज या महोत्सवात सत्कार होत होता. त्यात प्रियांका भेटली. माझ्याशी बोलता बोलता डोळ्यात पाणी आलं. म्हणाली, ताई आज कितीतरी वर्षांनी डोळे भरून आले, तुमच्याशी बोलून मन हलकं झालं...

तिची कथा ऐकताना मनात सतत याच ओळी येत होत्या...

बस अपनाही ग़म देखा है
तुने कितना कम देखा है
प्रियांकाला कडक सलाम !!!

*....वसुंधरा काशीकर*

# मी आयएएस झालो तरीही, काही बनू शकलो नाही - टी.एन. शेषन



श्री. टी.एन. शेषन हे, मुख्य निवडणूक आयुक्त होते. आपल्या पत्नीसह उत्तर प्रदेशच्या दौऱ्यावर जात असताना, त्यांच्या पत्नीने रस्त्याच्या कडेला एका झाडावर बयाचं (एक प्रकारचा पक्षी) घरटं पाहिलं आणि त्या म्हणाल्या, हे घरटं मला आणून द्या, मला घर सजवायचं आहे. श्री. टी.एन. शेषन यांनी सोबत चालणाऱ्या सुरक्षा रक्षकाला ते घरटं खाली उतरवण्यास सांगितलं. सुरक्षा रक्षकाने जवळच मेंढ्या-बकऱ्या चारणाऱ्या एका अशिक्षित मुलाला सांगितलं की, जर तू हे घरटं काढलंस तर, मी तुला दहा रुपये देईन. पण, त्या मुलाने नकार दिला. श्री. शेषन स्वतः गेले आणि त्या मुलाला पन्नास रुपये देण्याची ऑफर दिली; पण, मुलाने घरटं आणण्यास नकार दिला आणि म्हणाला, सर, या घरट्यात पक्ष्याची पिल्लं आहेत. संध्याकाळी जेव्हा त्या पिल्लांची 'आई' जेवण घेऊन येईल, तेव्हा ती खूप दुखी होईल; म्हणून, तुम्ही कितीही पैसे द्या, मी हे घरटं काढणार नाही. या घटनेबद्दल श्री. टी.एन. शेषन लिहितात... मला आयुष्यभर याचा खेद वाटला की, एका सुशिक्षित आयएएस अधिकाऱ्यामध्ये ती विचार आणि भावना का आली नाही, जी एक अशिक्षित मुलगा विचार करत होता? त्यांनी पुढे लिहिलं की, माझ्या सर्व डिग्री, आयएएस पद-प्रतिष्ठा, पैसा हे सगळं, त्या अशिक्षित मुलासमोर मातीमोल झालं. जीवन तेव्हाच आनंददायी बनतं, जेव्हा बुद्धी, संपत्ती आणि पद यांच्यासोबत संवेदनशीलताही असते.

---

**पंतप्रधानपदाला 'चौकीदारा'च्या पातळीवर आणून ठेवणाऱ्या 'नॉन-बायॉलॉजिकल' पंतप्रधानाला आई कशी असू शकते?**

...'नॉन-बायॉलॉजिकल' असूनही आपली दिवंगत आई अचानक आठवली, डोळ्यात मगरीचे खोटे अश्रू उभे राहिले... हे नक्राश्रू ढाळताना, जिचा कुठलाही व काडीचाही गुन्हा नसताना, क्रूरपणे टाकून दिलेल्या आपल्या 'बायको'साठी (जशोदाबेन) खरे अश्रू कधि ढाळणार?

देशविदेशातील सगळ्याच आघाड्यांवरच्या आपल्या लाजिरवाण्या व अपयशी कामगिरीबद्दल चकार शब्द तोंडून काढण्याची हिंमत नाही...पण, अशिक्षित-अडाणी बिहारींच्या मतांसाठी, करोना-काळात टाळ्याथाळ्या पिटणाऱ्या अमिताभ बच्चनलाही लाजवणारा रडण्याचा बेमालूम अभिनय करायचा?

...असला बेशरम अभिनय करण्यापूर्वी, जरा आपण सोनिया गांधी, सुनंदा पुष्कर (शशी थरूरांची दिवंगत पत्नी), ममता बॅनर्जी वगैरे महिलांबाबत किती अर्वाच्च भाषेत बोललो होतो...ते जरा आठवून पाहिलं असतं; तर, कोकणातल्या 'दशावतारी' नाटकातला किंवा बिहारच्या 'रामलीले'तला अभिनय सादर करायला, 'तथाकथित' ५६ इंची छाती धजावली नसती!

---

# ५० टक्के आणि ५० खोके....




...काही काळापूर्वी पंतप्रधान, ज्या देशातल्या उद्योग जगतासाठी लाल रंगाचा मऊशार गालिचा पसरुन पायघड्या घालत होते, त्याच देशाने नुकताच भाजप-संघीय राजकारण्यांच्या पार्श्वभागाखाली '५०% Tariff'चा 'बॉम्ब' फोडून त्यांना त्यांची 'औकात' दाखवून दिलीय... तेव्हा, त्या देशाच्या मालावर 'बहिष्कार' घालण्याऐवजी, यांच्याकडून गुंडागर्दी व भ्रष्टाचाराच्या राजकारणातून कमावलेल्या काळ्या पैशाला पांढरी रंगसफेदी करत, त्याच देशाचा 'माल' खरेदी करणं मोठ्याप्रमाणावर सुरु आहे.

**गावाखेड्यांमधील लहानग्यांना शाळेत जायला 'लाल परी' सुरु करण्याऐवजी आणि एसटी कर्मचारीवर्गाला न्याय देण्याऐवजी... एका अमेरिकन कंपनीची पहिली 'पांढरी' गाडी, राज्याचे परिवहन मंत्री घेताहेत; कशासाठी, तर नातवाला शाळेत सोडण्यासाठी, अरे व्वा पठ्ठे बाबूराव! नाहीतरी सध्या, 'एसटी'च्या सगळ्या संसाधनांचं 'खाजगीकरण' करुन इम्पोर्टेड गाड्या भरभरुन 'माल' खाणं सुरु आहे; जसा पूर्वी 'बकासूर' गाडा भरुन अन्न खात होता, त्याची ही, '५० खोके, एकदम ओके'च्या पुढची इयत्ता...** आता, जनतेनंच जागं होत, यांना तुझी यत्ता कंची, असा सवाल करत निवडणुकीत आडवं केलं पाहिजे!

***...राजन राजे*** *(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*

---

*कर्तव्यपथावर हत्या झाल्यावर*
*त्यांचा आत्मा विखरून*
*कोट्यवधी हृदयांची धडधड बनला*
*शोक ओसरल्यावर काही लोकांनी*
*त्यांचा चष्मा, काठी, कमरेवर लटकणारे घड्याळ,*
*झिजलेल्या चपला वगैरे वस्तू*
*आठवण म्हणून अनेक वर्षे जतन केल्या*
*अगदी कालपर्यंत जशाच्या तशा जपून ठेवल्या होत्या*
*नंतर काही लोक असे आले की*
*त्यांचा प्रथम नैतिक पाठिंबा वधकर्त्याला होता*
*परंतु कालांतराने महात्म्याला त्यांनी प्रातःस्मरणीय बनवले*
*या अतिशय हुशार लोकांनी पुढचा अधिक, खोल आणि*
*द्रष्टा विचार केला की, नॉस्टॅल्जीया नको उगाच*
*आणि दुसरे म्हणजे वस्तू ठेवून ठेवून निकामी होतील*
*म्हणून त्यांनी त्या विकसित केल्या*
*वापरातदेखील आणल्या म्हणजे असे...*
*महात्म्याच्या चष्म्याची फ्रेम बदलली*
*ती पोलादी करुन*
*तुटक्या काचा बदलून*
*तिथे अश्रुधुराच्या कांड्या बसवल्या, उपयोगी पडल्या*
*लाखो आंदोलनजिवींच्या डोळ्यातून पाणी काढले*
*ते पाणी रस्त्यावर ठोकलेल्या खिळ्यांना घातले*
*खिळे वाढविले...*
*कोणीतरी महात्म्याचा पंचा पैदा केला*
*तो त्यांनी भगवा केला*
*पंच्यावर सोन्याच्या धाग्यांनी लाखो वेळा स्वतःचेच नाव*
*विणून घेतले*
*आणि तो पूज्य भावनेने स्वतः पांघरला*
*अखिल जगाला भगव्या खादीचे जरतारी महत्त्व दाखवून दिले*
*काठीची रायफल केली*
*तिला चकचकीत धारदार संगीन बसवली*
*शेतकरी, कामगार, विद्यार्थी यांच्यावर रोखली*
*खूप वापरली*
*दसऱ्याच्या दिवशी तिची यथासांग पूजाही केली*
*महात्म्याच्या छातीतली गोळीही कुठून तरी शोधून काढली*
*गोठलेले हृदयरक्त साफसूफ करुन ती रायफलीत घालून*
*सज्ज ठेवली*
*वेळोवेळी उपयोगात आणली*
*स्तब्ध झालेल्या त्यांच्या घड्याळाचे काटे*
*मागे मागे फिरवले*
*इतिहासाचे नायक बदलून टाकले, नावे बदलली*
*काही गाळून टाकली...*
*महात्म्याच्या झिजलेल्या चपलांना*
*अणकुचीदार खिळे ठोकून*
*त्यांचे हजारो मजबूत पोलीसबूट बनवले*
*नव्या विकास मार्गात आडवे येणाऱ्यांना पायदळी तुडवले*
*आठ आठ पदरी विकास केला*
*आता त्यांनी संचलन सुरू केले आहे*
*एमजी रोडवर कर्फ्यू लागलेला आहे....*

**मोहन देस**

Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (RNI: MAHMAR/2023/88105)

**कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०**